# अनुक्रमणिका

**कामाचे नांवः** जल जीवन ममशन व स्वच्छ भारत ममशन ग्रामीण घनकचरा सांडपाणी व्यवस्थापनाच्या कामाच्या प्रभावी अंमलबजावणीकरता जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन जिल्हा परिषद सिंधुदुर्ग, या कार्यालयाकडे जिल्हा व तालुका स्तरावर १. समन्वयक (पाणी गुणवत्ता monitoring and surveillance) सनियंत्रण व निरिक्षण, २. पाणी व स्वच्छता व्यवस्थापन सल्लागार ३. डेटा एन्ट्री ऑपरेटर ४. उपविभागीय समन्वयक (पाणी गुणवत्ता) ५. शिपाई इत्यादी पदांसाठी बाहयस्थयांत्रणेव्दारे मनुष्यबळ उपलब्ध करून देणेबाबत.


| अ.क्र. | निविदेमध्ये समाविष्ट असलेला थोडक्यात तपशिल | पृष्ठ क्रमांक | |
|---|---|---|---|
| | | पासून | पर्यंत |
| 1. | 2. | 3. | 4. |
| 1. | निविदा देणाऱ्या व्यक्तींसाठी सुचना | पाठीमागे | |
| 2. | संक्षिप्त निविदा सुचना | -- | -- |
| 3. | मक्तेदारांना सविस्तर सुचना | -- | -- |
| 4. | छापील कराराचा नमुना | 1 | 28 |
| 5. | अनुसूचि "अ" | 21 | -- |
| 6. | अनुसूचि "अ"च्या अटी | 23 | 24 |
| 7. | अनुसूचि ब | 22 | -- |
| 8. | बांधकामाचा तपशिल | अनुसूचि 'ब'सोबत | |
| 9. | सर्व साधारण तपशिल आणि वाढीव अटी | 25 | 27 |
| 10. | मक्तेदाराचा जाहीरनामा | 28 | -- |
| 11. | निवेदन - 1 | नमुन्यासोबत जोडले आहे. | |
| 12. | निवेदन - 2 | नमुन्यासोबत जोडले आहे. | |
| 13. | निवेदन - 3 | नमुन्यासोबत जोडले आहे. | |
| 14. | निवेदन - 4 | नमुन्यासोबत जोडले आहे. | |


श्री. / श्रीमती. ---------------------------------------------------------------------------------- रा. ------------------------------------
-----------------

यांना दिनांक रोजी आदा केले.

मक्तेदार

निविदा देणाऱ्या व्यक्तीसाठी सूचना

| अ.क्र | तपशील |
|---|---|
| 1. | तशा प्रकारची मुभा दिलेली नसल्यास ठरलेली रक्कम निर्देशित बँकेत भरल्याबाबतचे चलन किंवा कॉल डिपॉझीट पावती जर मुभा दिलेली असल्यास ठरलेल्या रकमेला न भरण्याची मुभा दिली गेली असल्याबद्दलच्या दाखल्याची सांक्षाकित किंवा राजपत्रित अधिकाऱ्याने योग्य रितीने सांक्षाकित केलेली झेरॉक्स प्रत जोडली जावी.<br><br>या बाबी वेगळया लिफाफ्यात असाव्यात. |
| 2. | आयकर भरणेबाकी नसल्याबद्दलचे वैध मुळ प्रमाणपत्र किंवा त्याची सक्षम अधिकाऱ्याने सांक्षाकित केलेली झेरॉक्स प्रत. |
| 3. | वैध असलेली नोंदणी प्रमाणपत्राची प्रत त्याची सक्षम अधिकाऱ्याने साक्षांकित केलेली झेरॉक्स प्रत. |
| 4. | भागीदारीच्या करारनाम्याची व मुखत्यार पत्राची सांक्षाकित केलेली झेरॉक्स प्रत. |
| 5. | निविदा मागितलेल्या व प्रत्यक्षांत चालू असलेल्या कामांची यादी. (निवेदन क्र.1) |
| 6. | तशा प्रकारच्या केलेल्या कामांची व त्यांच्या परिणामाची यादी. (निवेदन क्र.2) |
| 7. | सदर कामाकरीता लगेच उपयोगी पडू शकेल अशा निविदा घेणाऱ्या व्यक्तिकडे उपलब्ध असलेली यंत्रसामुग्री व प्लँट याची यादी.(निवेदन क्र.3) |
| 8. | सदर निविदेमधील कामासाठी तांत्रिक काम करणाऱ्या व्यक्तींची सविस्तर माहिती. (निवेदन क्र. 4) |

महत्वाची सूचनाः- कृपया हे लक्षात घ्यावे की,यातील कोणताही कागदपत्र जोडलेला नसेल तर निविदा बाद ठरेल.

## निविदा देणाऱ्या व्यक्तीसाठी जादा सूचना

निविदा देताना खालील बाबी आढळल्या तर निविदा पुर्णतः नाकरली जाऊ शकते.

1. निविदा देणारी व्यक्ती निविदेमध्ये नमूद केलेले काम व नेमून दिलेला कालावधी किंवा इतर काही अटी यामध्ये काही बदल सुचवित असले तर.

2. निविदेतील कोणतीही पाने काढली असतील किंवा दुसरी जोडली असतील तर.

3. निविदेमध्ये खाडाखोड झाली असेल तर.

4. चिकटविलेल्या चिटीवर निविदा देणाऱ्या व्यक्तीने सर्व दुरुस्त्या किंवा जादा माहिती यांची नोंद केलेली नसेल तर.

5. पान नं.4 व 5 वर ज्यासाठी जागा सोडलेली आहे त्या ठिकाणी निविदा देणारी व्यक्ती व संस्था असल्यास प्रत्येक भागीदाराची सही किंवा सहया व साक्षीदाराच्या सही / सहया केलेली / केलेल्या नसतील तर.

6. कोणत्याही अटी नको असतील तर.

7. कोणत्याही प्रकारे अटीमध्ये कमी वा जास्त (चढउतार)असा फरक मागितला असेल तर.

8. सर्व प्रकारचे शासकीय व नगरपालिकेचे कर कंत्राटाच्या कालावधीत कंत्राटदाराने स्वतःभरावयाचे आहेत.

# नमुना ब - 1

*पाटबंधारे

*सार्वजनिक बांधकाम
रत्नागिरी मंडळजि.प.सिंधुदुर्ग विभाग

## प्रतिशत दराची निविदा व बांधकामाची संविदा

कंत्राटदारांच्या मार्गदर्शनासाठी सर्वसाधारण नियम व निर्देश

1. या संविदेअन्वये पार पाडण्यासाठी म्हणून प्रस्तावित केलेली सर्व बांधकामे निविदा मागवून अधिसूचित करण्यात येतील,निविदेवर कार्यकारी अभियंत्याने आपली स्वाक्षरी केलेली असेल व अशी निविदा त्यांच्या कार्यालयातील सूचना फलकावर लावलेली असेल.

या नमुन्यात पुढील बाबी म्हणजे पार पाडावयाचे बांधकाम,निविदा सादर करण्याचा व त्या उघडण्याचा दिनांक,बांधकाम पार पाडण्यासाठी मंजूर केलेला कालावधी, निविदेबरोबर जमा करावयाची इसाऱ्याची रक्कम, यशस्वी निविदा सादर करणाऱ्या व्यक्तीने जमा करावयाची प्रतिभूतिची रक्कम आणि बिलातून कोणतीही प्रतिशत रक्कम वजा करावयाची असल्यास ती रक्कम या बाबी नमूद करण्यात येतील. तसेच दगड खाणीच्या संबंधातील फी (क्वारी फी), स्वामित्वधन (रॉयल्टी), जकातीच्या देय रकमा आणि जमीन भाडे(ग्रांऊड रेट)यांचा परतावा मंजूर करण्यात येत असेल तर ती गोष्ट देखील अशा नमुन्यात नमूद केलेली असेल.बांधकामाच्या संबंधात आवश्यक असतील असे विनिर्देश (स्पेसिफिकेशन्स),संकल्पचित्रे (डिझाईन्स) व आरेखने (ड्रॉईंग्ज)अंदाजित दर आणि अनुसूचित दर तसेच तत्संबंधी इतर दस्तऐवज यांच्या प्रतीवर ओळखीदाखल कार्यकारी अभियंत्याची सही असेल आणि अशा प्रतीचे कंत्राटदारांना निरीक्षण करता यावे म्हणून या प्रती कार्यकारी अभियंत्याच्यां कार्यालयीन वेळेत त्यांना उपलबध करून देण्यात येतील.

कोणतेही बांधकाम कंत्राटदाराने शिफारस केलेल्या व जिल्हा परिषदेच्या वतीने सक्षम प्राधिकाऱ्याकडून मंजूर करण्यात आलेल्या विनिर्देशानुसार पार पाडण्याचे योजिले असेल, तर त्या प्रसंगी असे विनिर्देश आणि उपरोक्त संकल्पचित्रे व आरेखने ही स्वीकृत निविदेचाच एक भाग म्हणून निविदेत अंतर्भूत करण्यात येतील.

2. निविदा एखाद्या भागीदारी संस्थंने सादर केली असेल, तर त्या संस्थच्या प्रत्येक भागीदाराने अशा निविदेवर स्वतंत्रपणे सही केली पाहिजे. एखादा भागीदार अनुपस्थित असल्यास, अशी सही करण्याचा प्राधिकार देणारा मुखत्यारनामा धारण करणाऱ्या व्यक्तीने त्याच्या वतीने सही केली पाहिजे. ब

2(अ)1) निविदेसोबत कंत्राटदाराने निविदा फॉर्म फी व बयाण रक्कम ऑन लाईन प्रसिध्दी निविदेत नमुद केलेप्रमाणे भरली पाहिजे. सदरची रक्कम महा. शासन ग्रा.वि.वि.शासन परिपत्रक क्रं. निविदा-2014/प्र.क्र.164/परा-7 दि. 15 जुलै 2014 अन्वये NET BANKING द्वारे भरणा करणेची आहे.

**(सूचना :- निविदा फॉर्म फी व बयाणा रक्कम** NET BANKING **द्वारे जमा केलेबाबतची पावती लखोटा क्रमांक 1 मध्ये जोडणेची आहे. अन्यथा निविदा उघडली जाणार नाही.)**
सदर बयाणा रक्कम कोणत्याही प्रकारे व्याज पात्र ठरणार नाही.

आवश्यक नसेल ते खोडावे

(2)

2) एखादेवेळी इतर गौण बाबींची पुर्तता झाल्यावर उपखंड(3) खाली निविदा मंजूर झाली असेल तर कंत्राटाच्या सामान्य अटींच्या संदर्भात ठराविक बयाणा रकमेपेक्षा कमी रक्कम डिपॉझिट म्हणून स्विकारली जाईल.

3) जर टेंडर दिल्यानंतर त्यात काही सुधारणा झाल्यास कंत्राटदाराने निविदा काढून घेतली किंवा जर त्याचे टेंडर स्विकारल्यानंतर मक्तेदार असमर्थ ठरला किंवा सुरक्षा रक्कम पूर्ण करण्यामध्ये दुर्लक्ष केला तर कोणत्याही प्रकारचा पुर्वग्र न धरता जिल्हा परिषद आपल्या सामर्थ्याने व कायद्याने आगाऊ (बयाणा) म्हणून भरलेली सर्व रक्कम जप्त करील.

3. ज्यावेळी त्याची निविदा स्विकारली जाणार नाही त्यावेळी बयाणा म्हणून आगाऊ भरलेली रक्कम मात्र ती त्यापूर्वी उपखंड-3 प्रमाणे जप्त केलेली असता कामा नये. तर ती रक्कम पावती सादर केल्यावर परत दिली जाईल.

4. कोणतेही बांधकाम भागीदारी संस्थेकडून पार पाडण्यात आले असेल, तर अशा कामाबद्दल दिलेल्या रकमांच्या पावत्यांवरसुध्दा सर्व भागीदारांनी सहया केल्या पाहिजेत. मात्र कंत्राटदारानी त्यांची निविदा भागीदारी संस्थेच्या नावे सादर केली असेल तर त्या बाबतीत अशा पावत्यांवर भागीदारी संस्थेच्या नावाने कोणत्याही एका भागीदाराने किंवा ज्या व्यक्तीला संस्थेच्या वतीने परिणामकारक पावत्या देण्याचा प्राधिकार असेल त्या कोणत्याही इतर व्यक्तीने सही केली पाहिजे.

5. निविदा सादर करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने निविदेचा नेहमीचा छापील नमुना भरला पाहीजे व त्या अनुसूची 'ब'मध्ये (पार पाडावयाच्या बांधकामाच्या बाबी दर्शविणारे ज्ञापन) विनिर्दिष्ट केलेल्या दरापेक्षा किती अधिक किंवा कमी प्रतिशत दरांनी तो ते काम हाती घेण्यास तयार आहे ते नमूद केले पाहिजे. एकच दर किंवा सर्व अदांजित दर, अनुसूचित दर यासाठी उपरोक्त प्रतिशत दर नमूद करावा. निविदा मागवणाऱ्या उक्त नमुन्यात विनिर्दिष्ट केलेल्या बांधकामामध्ये किंवा बांधकाम पार पाडण्यासाठी दिलेल्या कालावधीमध्ये कोणताही फेरफार सुचवणाऱ्या किंवा ज्यात अन्य कोणत्याही शर्ती असतील अशा निविदा नामंजूर केल्या जाण्यास पात्र ठरतील. निविदेच्या कोणत्याही छापील नमुन्यात एकाहून अधिक कामाची निविदा अंतर्भूत असता कामा नये. परंतु दोन किंवा त्याहून अधिक बांधकामासाठी स्वतंत्र निविदा देण्याची कंत्राटदाराची इच्छा असल्यास त्यांनी प्रत्येक बांधकामासाठी स्वतंत्र निविदा सादर करावी. निविदा ज्या बांधकामासंबधिच्या असतील त्या बांधकामाचे नाव व क्रमांक पाकिटाच्या बाहेरील बाजूवर लिहिलेला असावा.

6. कार्यकारी अभियंता आणि इतर जि.प. कार्यालयातील दोन सहाय्यक ज्यानी निविदा सादर केली असेल त्या कंत्राटदारांच्या किंवा त्यावेळी तेथे हजर असलेल्या त्यांच्या प्रतिनिधीच्या समक्ष निविदा उघडील आणि योग्य नमुन्यातील तौलनिक विवरणपत्रात निरनिराळया निविदांच्या रक्कमांची नोंद तो करील.निविदा स्वीकारण्यात आल्यावर कंत्राटदार नियम 1 मध्ये नमूद केलेल्या,विनिर्देशांच्या प्रती व इतर दस्तऐवज यावर ओळखीदाखला सहया करील.निविदा नामंजूर करण्यात आल्यास कार्य.अभियंता निविदा सादर करणाऱ्या कंत्राटदाराने जमा केलेली इसाऱ्याची रक्कम परत मिळाल्याबद्दल पावती दिल्यावर तिचा परतावा देण्यासाठी संबंधित जि.प. च्या मु.ले.व.वि.अ.प्राधिकृत कारील.

7. निविदा निकालात काढण्यास सक्षम असलेल्या प्राधिकाऱ्यास सर्व किंवा कोणतीही निविदा नामंजूर करण्याचा अधिकार असेल.

8. या निविदेशी किंवा संविदेशी संबंधित असलेल्या बाबीबाबत कंत्राटदाराने जी कोणतीही रक्कम भरलेली आहे असे त्यांचे म्हणणे असेल त्या रकमेबाबत दिलेल्या पावतीवर कार्यकारी अभियंत्याने सही केली असल्याखेरीज ती पावती विधीग्राहय जिल्हा परिषदेवर बंधनकारक असणार नाही.

9. ज्या कामासाठी निविदा मागवावयाच्या असतील त्या कामाचे ज्ञापन जिल्हा परिषद विभागाने पुरवठा करावयाच्या सामुग्रीची अनुसूची आणि त्यांचे दर, निविदा देण्यापूर्वी कार्यकारी अभियंत्यांच्या कार्यालयाने भरावेत व पूर्ण करावेत. इच्छुक निविदाकाराला दिलेला नमुना अशा प्रकारे भरलेला व पुर्ण केलेला नसल्यास, त्याने ही निविदा पूर्ण करून पाठविण्यापूर्वी तसे करण्याची उक्त कार्यालयास विनंती करावी.

सर्व बांधकामे प्रमाणमापानुसार व जिल्हा परिषद विभागाच्या नियमानुसार व रुढीनुसार नक्तेपणे मोजण्यात येतील आणि त्यांचे दर कोणत्याही स्थानिक रुढीप्रमाणे असावेत.

* आवश्यक नसेल ते खोडावे

10. प्रत्येक नोंदणीकृत कंत्राटदाराने आपल्या टेंडर सोबत तो योग्य दर्जाचा कंत्राटदार (ठेकेदार)असल्याबद्दलचे प्रमाणपत्र तसेच त्याचे नुतनीकरण व संपण्याची तारीख या गोष्टी सादर केल्या पाहिजेत.

11. सर्व दुरुस्त्या आणि वाढीव बाब नमूद करून आद्याक्षरी करावी.

12. बांधकामाची माजमापे जि.प.विभागामध्ये वापरात असलेल्या नेहमीच्या पध्दतीनुसार घेण्यात येतील आणि पर्यायी पध्दती स्वीकारण्याबाबतचे कोणतेही प्रस्ताव स्विकारण्यात येणार नाहीत. जि.प.विभागात वापरात असलेलीधनेहमीची पध्दतीध कोणती आहे याबाबत कार्यकारी अभियंत्यांचा निर्णय अंतिम राहील.

13. निविदा देणाऱ्या कंत्राटदाराने जी कोणतीही कामे पार पाडण्यासाठी यापूर्वी संविदा केल्या आहेत.ती सर्व कामे आणि निविदा सादर करण्याच्या दिनांकास त्या प्रत्येक बाबतीत पार पाडावयाचे राहून गेलेल्या कामाचे मूल्य या संबंधीचे एक प्रतिज्ञापन तो आपल्या निविदेबरोबर सादर करील.

14. प्रत्येक निविदाकार आपल्या निविदेबरोबर,आयकर मंडल किंवा त्याच्या आयकराची आकारणी ज्यात केली जाते तो जिल्हयाचा वॉर्ड,आकारणी क्रमांकाचा संदर्भ आणि आकारणीचे वर्ष या संबंधीची माहिती सादर करील.

15. विदेशी चलन उपलब्ध होण्यात येणाऱ्या अडचणी लक्षात घेता संविदा केलेले काम पार पाडण्याकरिता लागणारे संयंत्र व यंत्रसामग्री यांच्या खरेदीसाठी विभागाकडून कोणतेही विदेशी चलन देण्यात येणार नाही.

16. कराराच्या अनुसूचि 'अ'अनुसार त्याला देण्यात आलेली नियंत्रित व किंमती साहित्य सामग्री साठविण्यासाठी कंत्राटदाराला कामाच्या जागी, दुहेरी कुलुपाची व्यवस्था असलेली छपरी बांधावी लागेल.त्यानंतर ही साहित्यसामग्री त्या विभागाच्या व्यक्ती समक्ष वापरासाठी नेण्यात येईल. कोणतीही साहित्यसामग्री कामाच्या जागेतून हलविण्याची मुभा असणार नाही.

17. तसेच,कंत्राटदार त्यांच्या ताब्यात आणि कामगाराने वापरण्याचे योजलेली जी कोणतीही यंत्रसामग्री त्याच्या ताब्यात असेल,तीची यादीही देतील.

18. यशस्वी कंत्राटदाराने निविदा स्विकारणाऱ्या अधिकाऱ्याचे समाधान हाईल अशा प्रकारचे वैध व चालू व त्याच्या नावाने असलेली परवाना कॉन्ट्रक्ट लेबरच्या(रेग्युलेशन ॲण्ड ॲबॉलीशन ॲक्ट 1970)प्रमाणे काम सुरू करण्यापूर्वी सादर केले पाहिजे.तसे न झाल्यास निविदा काढून घेतली जाईल व बयाणा रक्कम जिल्हा परिषदेकडे जमा केली जाईल.

19. कंत्राटदाराची 1961 च्या ॲप्रेंटिस ॲक्टप्रमाणे तसेच त्या अन्वये वेळोवेळी निघालेल्या आदेशाचे पालन करण्याची जबाबदारी राहील. असे करण्यास तो अपात्र ठरला तर तो कंत्राटाचा नियम मोडल्याचा अपराध ठरेल आणि जिल्हा परिषदेचे अधिकारी आपल्या निर्णयान्वये कंत्राट रद्द करतील. त्या कायदयाच्या कोणत्याही तरतुदीचे उल्लंघन केल्यास कोणत्याही प्रकारे होणाऱ्या आर्थिक नुकसानाला कंत्राटदार जबाबदार राहील.

बांधकामाची निविदा

मी/आम्ही,याव्दारे खाली दिलेल्या ज्ञापनात नमूद केलेल काम,सर्व बाबतीत या निविदेचा नियम 1 आणि या सोबत जोडलेल्या संविदेच्या शर्तीच्या खंड 12 यात उल्लेखिलेले विनिर्देश संकल्पचित्रे,आरेखने व लेखी अनुदेश यांच्या अनुसार अनुसूची'ब'(पार पाडावयाच्या बांधकामाच्या बाबींचे ज्ञापन)मध्ये नोंद केलेल्या अंदाजित (आकडयात तसेच दरापेक्षा+प्रतिशत..............................कमी/अधिक दरांनी उपरोक्त ज्ञापनामध्ये अक्षरी विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत पार पाडण्यासाठी(जिल्हा परिषद अधिकारी ज्याचा यात यापूर्वी व यानंतरध जि.प.म्हणून उल्लेख करण्यात आला आहे) यांना निविदा सादर करीत आहे / आहोत आणि जेव्हा बांधकामासाठी लागणारी साहित्य सामग्री जि.प.कडून पुरवण्यात आली असेल तेव्हा अशी साहित्य सामग्री व त्यासाठी द्यावयाचे दर येथील अनुसूची 'अ ' मध्ये तरतूद केल्याप्रमाणे असतील असेही मी / आम्ही कबूल करीत आहे / आहोत.

ज्ञापन

| | |
|---|---|
| (अ) अनेक गौणकामाचा समावेश असल्यास त्यांचे तपशील स्वतंत्र सूचीमध्ये द्यावेत. | 1.(अ) सर्वसाधारण वर्णन<br>रू.<br>(ब) अंदाजित खर्च<br>रू. |
| (क) ठेवावयाची इसाऱ्याची रक्कम महाराष्ट्र सरकारी बांधकाम नियम पुस्तिकेच्या परिच्छेद 204 व 205 च्या तरतुदीनुसार असावी. | (क) इसाऱ्याची रक्कम<br>रू.<br><br>(ड) प्रतिभूत ठेव -- |
| (ड) ही ठेव रक्कम महाराष्ट्र सरकारी बांधकाम नियम पुस्तिकेच्या परिच्छेद 211 व 212 अनुसार असावी. | (एक) रोख रक्कम (इसाऱ्याच्या रकमेपेक्षा कमी नाही इतका) रू.<br>(दोन) चालू बिलामधून वजा करावयाची रू.<br>__________<br>एकूण रू.<br>__________ |
| (ई) जेव्हा प्रतिभूति म्हणून कोणतीही ठेव घेण्यात आली नसेल तेव्हा ही प्रतिशत रक्कम बाबीच्या आवश्यकतेनुसार 5 टक्क्यापासून 10 टक्क्यापर्यंत कमी अधिक होईल. | (ई) किंमतीवरून मोजमाप केल्याप्रमाणे अर्धे बांधकाम पूर्ण केले असेल यावेळी प्रतिभूति ठेव म्हणून आवश्यक असलेल्या एकूण रकमेच्या भरपाईसाठी बिलातून कोणतीही रक्कम टक्केवारीने वजा करावयाची असल्यास ती रक्कम 4 टक्के<br><br>(फ) बांधकाम सुरू करण्यासाठी दिलेल्या लेखी आदेशाच्या दिनांकापासून बांधकामासाठी मंजूर केलेला कालावधी. महिने |
| (फ) विविध बाबी पूर्ण करावयाच्या असल्यास आवश्यक तेथे दिनांक दर्शविणारी अनुसूची द्यावी. | 2. मी / आम्ही असे कबुल करतो की, आम्ही देवू केलेले काम स्विकारणेसाठी ती उघडण्याच्या ठरलेल्या तारखेनंतर 120 दिवस आणि त्यानंतर माझ्याकडून / आमच्याकडून काढून घेतली जाईपर्यंत कालावधी राहील. सदर काम काढून घेण्यासाठी मी / आम्ही योग्य त्या अधिकाऱ्याला लेखी नोटीस पाठवू. कोषागार बँक चलन नंबर आणि तारीख आणि डिपॉझीट अॅट कॉल रिसीटच्या नंबर व तारीख किंवा एक वर्षाच्या कालावधीसाठी रक्कम भरलेली असल्यास त्या रीसीटचा नंबर आणि तारीख ............................ किती रुपये भरलेले आहेत. रक्कम शब्दात....................................... बयाणा रक्कमेबद्दल अधिक माहिती पुढे देत आहे / आहोत. बयाणा रक्कमेवर आमचा कोणत्याही प्रकारे अधिकार रहाणार नाही व ती जिल्हा परिषदेस जमा होईल. जर मी / आम्ही पुढील बाबीत अपात्र ठरलो (1) वर उल्लेख केलेला कालावधीची अट पाळली गेली नसेल किंवा (2) सही करणे तसेच अभियंत्यास आवश्यक असलेले कागदपत्र सादर केले नसतील. तसेच मेमोरॅडमच्या परिच्छेद-1 मध्ये (ड) भागात नमूद केलेली सुरक्षिततेची हमीची रक्कम अॅनेक्चर जनरल कंडीशन ऑफ कॉन्ट्रक्ट मधील खंड 1 मध्ये घातलेल्या कालावधीमध्ये भरली नसेल तर बयाणा रक्कम आमच्या हमीची लेखी मागणीप्रमाणे रक्कम म्हणून जमा केली जावी किंवा मला / आम्हाला परत केली जावी.<br><br>3. ही निविदा स्वीकारण्यात आल्यास, मी / आम्ही यासोबत जोडलेल्या संविदेच्या सर्व अटी आणि शर्तीच्या तरतुदींचे पालन करण्याचे आणि त्या जितपत लागू होत असतील तितपत पूर्ण करण्याचे कबूल करीत आहे / आहोत, आणि तसे करण्यात कसूर झाल्यास उक्त शर्तीमध्ये नमूद केलेली रक्कम समर्पित (फॉरफीट) होईल व ती रक्कम मी / आम्ही जि.प.ला देईल / देऊ असेही कबूल करीत आहे / आहोत. |
| ( निविदा सादर करण्याऱ्याची सही | कंत्राटदार सही (पत्ता<br><br>दिनांक माहे 20 |

(5) इकंत्राटदाराच्या सहीसाठी

सही इ (साक्षीदार) साक्षीदाराची सही

(पत्ता)

(व्यवसाय)

रक्कम अक्षरी व आकडयात विनिर्दिष्ट करावयाची.

वरील निविदा जि.प.अधिकारी व त्यांच्यावतीने मी येथे स्वीकारीत आहे.

इ इ स्वीकारणाऱ्याची सही

कार्यकारी अभियंता

विभाग (किंवा त्यांचा यथोचितरित्या

प्राधिकृत सहायक)

दिनांक माहे 20 प्रतिभूति ठेव

संविदेच्या शर्ती

खंड 1 :- जिची / ज्यांची निविदा स्वीकारण्यात येईल अशा व्यक्तीने / अशा व्यक्तींनी (जिला / ज्यांना यापुढे कंत्राटदार म्हणून संबोधण्यात आले असून त्या शब्दप्रयोगात अपवर्जित केले नसेल किंवा संदर्भात प्रतिकूल नसेल तर तिचे / त्यांचे वारस, मृत्यूपत्र व्यवस्थापक, प्रशासक व अभिहस्तांकित यांचा समावेश असेल.)

रोख प्रतिभूति ठेव घेण्यात आली नसेल तर (अ) खोडून टाकावी.

(अ) तिची निविदा स्वीकरण्याबाबतची अधिसूचना मिळाल्यानंतर तिने दहा दिवसांच्या मर्यादेपर्यंत निविदेमध्ये विनिर्दिष्ट केलेली संपूर्ण प्रतिभूति ठेव पूर्ण होईल इतकी पुरेशी रक्कम कार्यकारी अभियंत्याकडे (12 महिन्यापेक्षा अधिक कालावधीसाठी ठेवलेली असल्यास) ठेवली पाहिजे, संबंधित अधीक्षक अभियंत्याला तसे करणे योग्य वाटल्यास अधीक्षक अभियंता ही मर्यादा, पंधरा दिवसापर्यंत वाढवू शकेल. किंवा

(ब) संविदेनुसार केलेल्या बांधकामासाठी शासनाकडून कोणतेही प्रदान करण्यात येत असताना अशा प्रकारे देय असलेल्या सर्व पैशांच्या ................ टक्के इतकी रक्कम वजा करण्यास व अशा वजाती प्रतिभूति ठेव म्हणून ठेवण्यास शासनाला परवानगी दिली पाहिजे. मात्र कंत्राटदाराने वरील (अ) मध्ये पूर्वकालीक केल्याप्रमाणे प्रतिभूती ठेवीव्दारे ठोक रक्कम ठेवली पाहिजे, अशा वेळी आणि अशा प्रकरणांमध्ये, अशा रीतीने ठेवलेली रक्कम ही बांधकामाच्या एकूण अंदाजित खर्चाच्या ............ टक्के इतकी नसेल तर, संविदेनुसार केलेल्या बांधकामासाठी कंत्राटदाराला केणतेही प्रदान करताना प्रतिभूति ठेवीची संपूर्ण रक्कम भरेपर्यंत शेवटी उपरोक्त असल्याप्रमाणे अशा प्रत्येक भरण्यातून पुरेशी रक्कम वजा करून ............. टक्के इतकी पूर्ण रक्कम भरून काढणे शासानासाठी विधियुक्त असेल. कंत्राटदाराकडून त्यांच्या संविदेतील अटीनुसार शासनाला देय असलेल्या सर्व भरपाईच्या किंवा इतर रकमा त्यांच्या प्रतिभूति ठेवीच्या पुरेशा भागातून किंवा त्यांच्या विक्रीव्दारे किंवा त्यावर येणाऱ्या व्याजातून किंवा कोणत्याही कारणासाठी शासनाकडून कंत्राटदाराला देय असलेल्या किंवा देय होणाऱ्या कोणत्याही रकमातून वजा करण्यात किंवा भरण्यात येतील आणि अशा कोणत्याही वजातीमुळे (किंवा उपरोक्त प्रमाणे केलेल्या विक्रीमुळे) त्याची प्रतिभूति ठेव घटत असेल तेव्हा कंत्राटदार त्यानंतरच्या दहा दिवसामध्ये प्रतिभूति ठेवीमधून वजा करण्यात आलेली किंवा प्रतिभूति ठेव किंवा तिचा कोणताही भाग यांच्या विक्रीव्दारे उभारण्यात आलेली कोणतीही रक्कम किंवा कोणत्याही रकमा यांनी रोखीने किंवा उपरोक्तप्रमाणे पृष्ठांकित केलेल्या सरकारी रोख्यांनी भरपाई करील. निर्दिष्ट प्रतिभूति ठेव रोख रकमेत दिलेली असेल तेव्हा ठेवीदाराने तशी स्पष्टपणे लेखी इच्छा दर्शविल्यास अशा रकमेचे ठेवीदाराच्या खर्चाने व्याजी कर्जरोख्यामध्ये रुपांतर करता येईल.

*ही टक्केवारी निविदेतील (ई) मध्ये दिली असेल तितकीच असेल.

(6)

वरील (अ) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीमध्ये ठोक रकमेत द्यावयाची प्रतिभूती ठेवीची रक्कम न भरल्यास आधीच स्वीकारण्यात आलेली निविदा संविदा रद्द झाली असे समजण्यात येईल व ती रक्कम वसूल करण्यासाठी कायदेशीर उपाय योजण्यात येतील. कंत्राटदाराने ठेवलेली प्रतिभूती ठेवीची, अंतिम बिल दिल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यानंतर किंवा कंत्राटदाराने ज्या दिनांकापर्यंत बांधकाम सुस्थितीत ठेवण्याचा करार केला असेल त्या दिनांकाच्या समाप्तीनंतर यापैकी जो नंतरचा असेल त्या दिवशी परतफेड करण्यात येईल.

अशा प्रकारची तारीख संपलेली नसेल तर शेवटच्या देयकाच्या वेळी हमीपत्राची 50% रक्कम परत केली जाईल. हमी पत्राची जिल्हा परिषदेने ठेवलेली रक्कम कंत्राटदाराने सदर काम चांगल्या स्थितीत टाकण्याची ज्या कालावधीची मान्यता दिली असेल तो कालावधी संपल्यानंतर दिली जाईल. जर असे घडले की कंत्राटदाराने सदर काम चांगल्या स्थितीत ठेवण्याची ज्या कालावधीकरीता मान्य केलेले असेल तो संपेपर्यंत त्या कामात योग्य त्या दुरुस्त्या करण्यामध्ये कंत्राटदाराने अपात्रता दाखविली किंवा दुर्लक्ष केले तर 17 आणि 20 या खंडामध्ये असलेल्या तरतुदीनुसार जिल्हा परिषदेने हमी पत्राची म्हणून ठेवलेली रक्कम खात्याने जादा केलेल्या खर्चाची किंमत म्हणून समायोजित केली जाईल.

खंड 2 :- निविदेमध्ये नमूद केल्याप्रमाणे बांधकाम पार पाडण्यासाठी अनुज्ञेय असलेला कालावधी काटेकोरपणे पाळला जाईल आणि कंत्राटदाराला ज्या दिनांकाला बांधकामाला सुरुवात करण्याबाबतचे आदेश दिले असतील त्या दिनांकापासून गणना करण्यात येईल. संविदेने नेमून दिलेल्या संपूर्ण कालावधीमध्ये हे बांधकाम शक्य तितक्या वाजवी तत्परतेने केले जाईल. (कंत्राटदाराच्या बाजूने मुदत हे संविदेचे मुख्यांग मानले जाईल) आणि ठरलेल्या दिनांकानंतर जितके दिवस बांधकाम सुरू होणार नाही किंवा पुरे होणार नाही, त्यापैकी प्रत्येक दिवसाबद्दल कंत्राटदार संपूर्ण बांधकामाच्या निविदेत जो अंदाजित खर्च दर्शविला असेल त्या रकमेपैकी जि.प. अधिकारी ठरवील त्याप्रमाणे (त्यांचा निर्णय लेखी राहील) अंदाजित एक टक्का किंवा त्यासारखी कमी रक्कमा भरपाई म्हणून देईल आणि जेथे जेथे कोणत्याही बांधकामाला ते पूर्ण करण्यास एक महिन्यापेक्षा अधिक काळ अनुज्ञेय असेल अशा सर्व प्रकरणामध्ये बांधकामाच्या अंमलबजावणीच्या काळात ते योग्य रातीने चालू राहील याबाद्दल हमी देण्यास कंत्राटदार बांधील असेल.

| संपूर्ण प्रतिभूती ठेव जप्त करण्यात आली असेल अशा वेळी करावयाची कार्यवाही | | | |
|---|---|---|---|
| | ै | * बांधकाम कालावधीत | ै |
| | र्ेे | वरीलप्रमाणे वरीलप्रमाणे | र्ेे |
| | ैे | वरीलप्रमाणे वरीलप्रमाणे | ैे |

* टीप :- यासाठी प्रत्येक प्रकरणाची परिस्थिती विचारात घेतल्यानंतर संविदा स्वीकारण्यास सक्षम असलेल्या अधिकाऱ्याने वर विनिर्दिष्ट करावयाच्या विशिष्ट कालावधीत करावयाच्या बांधकामाचे परिणाम निश्चित करावे व त्यासाठी सोडलेल्या मोकळया जागेत ते भरावे.

आणि त्याने, कार्यकारी अभियंत्याने खाली निर्धारित केलेल्या तपशीलावर प्रगती कार्यक्रमांचे पालन करावे. --

या शर्तीचे अनुपालन करण्यास कंत्राटदाराकडून कसूर झाल्यास कामाचे नियत परिणाम अपूर्ण राहील अशा प्रत्येक दिवसासाठी संपूर्ण कामाच्या उपरोक्त अंदाजित खर्चाच्या एक टक्का किंवा जि.प. अधिकारी (ज्यांचा लेखी निर्णय हा अंतिम असेल) ठरवून देईल. अशी त्याहून कमी रक्कम, यांच्या बरोबरची रक्कम भरपाई म्हणून देण्यास तो पात्र ठरेल. मात्र, या खंडाच्या तरतुदीनुसार द्यावयाची भरपाईची एकूण रक्कम ही निविदेमध्ये दर्शविण्यात आलेल्या बांधकामाच्या अंदाजित खर्चाच्या 10 टक्क्यापेक्षा अधिक असता कामा नये.

खंड 3 :- जेव्हा या संविदेतील कोणत्याही खंडानुसार किंवा खंडानुसार कंत्राटदार त्यांच्या संपूर्ण प्रतिभूति ठेवीच्या ( मग ती रोख दिलेली असो किंवा हप्त्याव्दारे वजा केलेली असो) रकमेइतकी भरपाई देण्सास पात्र असलेल्या किंवा कंत्राटदाराला गंभीर आजार झाल्यामुळे किंवा त्याच्या मृत्यूमुळे बांधकाम सोडून देण्यात आलेल्या किंवा इतर कोणत्याही खंडाच्या बाबतीत जि.प.च्या हिताच्या दृष्टीने त्याला योग्य वाटेल अशा खालीलपैकी कोणत्याही मार्गाचा अवलंब करण्याच्या शक्ती, जि.प.च्या वतीने कार्यकारी अभियंत्याला असतील.

(7)

(अ) संविदा विखंडीत करणे (कार्यकारी अभियंत्याच्या सहीने कंत्राटदाराला दिलेली विखंडनाची लेखी नोटीस हा याचा निर्णायक पुरावा ठरेल) आणि अशा बाबतीत कंत्राटदाराची प्रतिभूति ठेव जप्त करण्यात येईल व ती पूर्ण जि.प. च्या स्वाधीन असेल.

(ब) बांधकामाचा खर्च, हत्यारे व संयंत्र यावर केलेला खर्च आणि बांधकामाचा पार न पाडलेला भाग पूर्ण करून घेण्यासाठी नियुक्त केलेल्या कार्यव्यापी आस्थापनेच्या खर्चासह जादा पर्यवेक्षी कर्मचारी वर्गावरील खर्च कंत्राटदाराच्या नावे खर्ची टाकून काम किंवा त्याचा कोणताही भाग विभागाव्दारे पार पाडणे आणि कंत्राटदाराने त्याच्या संविदेतील शर्तीनुसार बांधकाम पार पाडले असते तर ज्या बाबतीत ज्या पध्दतीने व ज्या दराने त्याने ते केले असते त्या सर्व बाबतीत त्याच पध्दतीने पार न पाडलेल्या बांधकामाचा भाग विभागाव्दारे पूर्ण करून त्याची किंमत त्याच्या जमाखाती टाकणे, अशा प्रकारे केलेला खर्च व इतर संलग्न खर्च आणि अशा प्रकारे विभागाव्दारे पार पाडलेल्या बांधकामाची किंमती याबाबतीत, कार्यकारी अभियंत्यांचे प्रमाणपत्र हे अंतिम असेल व ते कंत्राटदाराविरुध्द निर्णायक असेल.

(क) कंत्राटदाराच्या बांधकामाचे मोजमाप करून घेण्याचा आदेश देणे आणि त्याच्या हातून पार न पडलेल्या बांधकामाचा भाग त्याच्याकडून काढून घेणे आणि तो पूर्ण करण्यासाठी दुसऱ्या कंत्राटदाराला देणे या बाबतीत नवीन संविदा अभिकरण निश्चित करण्यासाठी जाहिरातीवर केलेला खर्च, कार्यव्ययी आस्थापनेवरील खर्चासह जादा पर्यवेक्षी कर्मचारीवर्गावरील खर्च व नवीन संविदा अधिकरणाने पार पाडलेल्या कामाचा खर्च, हा सर्व खर्च कंत्राटदाराच्या नावे खर्ची घालण्यात येईल व नवीन कंत्राटदाराने केलेल्या किंवा पार पाडलेल्या बांधकामाची किंमत, कंत्राटदाराने त्याच्या संविदेच्या अटीनुसार बांधकाम पार पाडले असते तर ज्या पध्दतीने व दराने जमा करण्यात आली असती, त्या सर्व बाबतीत त्याच पध्दतीने कंत्राटदाराच्या जमाखाती धरण्यात येईल. उपरोक्त प्रमाणे किंवा पार न पाडलेले बांधकाम नवीन कंत्राटदाराकडून पार पाडून घेण्यासाठी केलेला बांधकामाचा खर्च व इतर खर्च आणि अशा प्रकारे केलेल्या बांधकामाची किंमत याबाबतीत कार्यकारी अभियंत्यांचे प्रमाणपत्र हे अंतिम असेल व ते कंत्राटदाराविरुध्द निर्णायक असेल.

वरील खंड (अ) अन्वये संविदा विखंडित करण्यात आल्यास कंत्राटदाराला त्याने संविदेनुसार त्यापूर्वी पार पाडलेल्या कोणत्याही बांधकामाकरिता अशा बांधकामाचे कार्यपालन व त्याबाबत त्याला देय असलेली रक्कम यासंबंधी कार्यकारी अभियंत्याने लेखी प्रमाणित केले असल्याखेरीज अन्यथा कोणतीही रक्कम वसूल करण्याचा किंवा मिळण्याचा हक्क असणार नाही. खंड (ब) किंवा (क) मध्ये निर्दिष्ट केलेल्यापैकी कोणत्याही मार्गाचा अवलंब करण्यात आला असेल आणि विभागामार्फत किंवा नवीन कंत्राटदारामार्फत पार पाडलेल्या बांधकामाचा खर्च व इतर संलग्न खर्च हा अशा बांधकामाच्या किंमतीपेक्षा अधिक होत असेल, व ती रक्कम कंत्राटदाराच्या नावावर जमा करण्यात आली असेल अशा प्रसंगी ती जादा रक्कम कंत्राटदाराला संविदेनुसार जि.प.कडून किंवा अन्यथा देय असलेल्या रक्कमेतून कशाही प्रकारे किंवा त्याच्या प्रतिभूति ठेवीतून किंवा तिच्या विक्रीच्या उत्पन्नातून वजा करण्यात येईल. मात्र विभागामार्फत किंवा नवीन कंत्राटदारामार्फत केलेल्या बांधकामाची प्रमाणित किंमत ही अशा बांधकामाचा प्रमाणित खर्च व सलग्न खर्च यापेक्षा अधिक झाली, तरीही कंत्राटदाराला जि.प. विरुध्द मागणी करता येणार नाही. मात्र खंड(अ), (ब) किंवा (क) मध्ये नमूद केलेल्या तीन मार्गापैकी कोणत्याही मार्गाचा कार्यकारी अभियंत्याने अवलंब केला असला तरी, कंत्राटदाराला बांधकाम पार पाडण्यासाठी किंवा ते पार पाडण्याच्या दृष्टीने किंवा संविदेचे पालन करण्यासाठी कोणतेही साहित्य खरेदी केल्यामुळे किंवा त्यांचे प्रापन केल्यामुळे किंवा कोणत्याही वचनबध्दतेमुळे किंवा कोणतेही अग्रिम दिल्यामुळे कोणतीही हानी सोसावी लागल्यास त्याबद्दल भरपाईचा दावा करता येणार नाही.

बांधकामाच्या कोणत्याही भागाची प्रगती असमाधान-कारक असल्यास करावयाची कार्यवाही.

खंड 4:- बांधकामाची सर्वसाधारण प्रगती खंड 2 मध्ये नमूद केलेल्या शर्तीनुसार असूनसुध्दा कामाच्या कोणत्याही विशिष्ट भागाची प्रगती असमाधानकारक असल्यास, कंत्राटदाराला 10 दिवसांची लेखी नोटीस दिल्यानंतर कार्यकारी अभियंत्याला खंड 3(ब) अन्वये त्याच्याविरुध्द कार्यवाही करण्याचा हक्क असेल अशा कार्यवाहीमुळे कंत्राटदाराला सोसाव्या लागलेल्या कोणत्याही हानीबद्दल भरपाईची मागणी करता येणार नाही.

(8)

खंड 3 व 4 अन्वये कार्यवाही केली नसली तरी कंत्राटदार भरपाई देण्यास पात्र असेल

खंड 5 :- कार्यकारी अभियंत्यास येथील खंड 3 व 4 अन्वये प्रदान करण्यात आलेल्या कोणत्याही शक्ती वापरण्याजोग्या झाल्या असतील व त्या वापरण्यात आल्या नसतील अशा कोणत्याही प्रकरणात येतील. अशा कोणत्याही शर्तीचा वापर न केल्यामुळे त्यांचे हक्क विसर्जन होणार नाही आणि अशा शक्ती वापरण्यायोग्य असतानाही कंत्राटदाराने भविष्यकाळात केव्हाही एखादी कसूर केल्यास अशा प्रसंगी, येथील कोणत्याही खंडानुसार किंवा खंडानुसार त्यांच्या प्रतिभूति ठेवीच्या संपूर्ण रकमेइतकी भरपाई देण्यास तो पात्र असल्याचे घोषित करण्यात येईल आणि प्रसंगी भूतकाळातील व भविष्यकाळातील भरपाईबाबतचे कंत्राटदाराचे दायित्व अबाधित राहील.

कंत्राटदाराचे संयंत्र ताब्यात घेणे किंवा आवश्यक तेथे हलविणे किंवा त्यांची विक्री करणे बाबतच्या शक्ती

कार्यकारी अभियंत्यास खंड 3 च्या उप-खंड (अ) किंवा (क) अन्वये कार्यवाही करीत असताना त्याची तशी इच्छा असल्यास बांधकामामधील किंवा बांधकामावरील किंवा बांधकामाच्या जागेवरील किंवा कंत्राटदाराच्या मालकीचे किंवा त्याने प्रापण केलेली आणि बांधकाम किंवा त्याचा कोणताही भाग पार पाडण्याच्या उद्देशाने आणलेली सर्व किंवा कोणतीही हत्यारे, संयंत्र साहित्य आणि सामान ताब्यात घेता येईल व त्यासाठी पैसे देऊन किंवा संविदेच्या दराने लेख्यामध्ये घेऊन किंवा संविदेचे दर लागू होण्याजोगे नसतील त्याबाबतीत चालू बाजारभावाने प्रदान करून त्यांचा वापर करता येईल. हे बाजारभाव कार्यकारी अभियंत्याने प्रमाणित करावयाचे असून ते अंतिम राहतील किंवा कार्यकारी अभियंता, कंत्राटदाराला किंवा त्याच्या कामावरील लिपिकाला किंवा कार्यदेशकाला किंवा इतर अधिकृत अभियंर्त्याला लेखी नोटीस देऊन अशी हत्यारे, संयंत्र, साहित्य किंवा सामान अशा नोटीशीमध्ये विनिर्दिष्ट करावयाच्या कालावधीमध्ये त्या जागेमधून हलविण्यास फर्मावू शकेल, आणि कंत्राटदार अशा कोणत्याही मागणीचे पालन करण्यात कसूर करील अशावेळी कार्यकारी अभियंता व कंत्राटदाराच्या खर्चाने हलवू शकेल किंवा त्याची कंत्राटदारांच्या खाती व सर्व बाबतीत त्याच्या जोखमीवर लिलावाव्दारे किंवा खाजगीरित्या विक्री करू शकेल आणि अशा सामान हलवण्याच्या कोणत्याही खर्चाच्या बाबतीत कार्यकारी अभियंत्याचे प्रमाणपत्र व अशा कोणत्याही विक्रीचे उत्पन्न व खर्चाची रक्कम ही अंतिम व कंत्राटदाराविरुध्द निर्णायक असेल.

मुदत वाढ

खंड 6 :- बांधकामाच्या अंमलबजावणीमध्ये अपरिहार्य असे अडथळे आल्याच्या सबबीवर किंवा इतर कोणत्याही कारणासाठी, काम पूर्ण करण्याकरीता मुदतवाढ घेण्याची कंत्राटदाराची इच्छा असल्यास तो निविदेमध्ये करारनिर्दिष्ट केलेला कालावधी संपण्यापूर्वी किंवा पूर्वी सांगितल्याप्रमाणे त्याला अडथळा आल्याचा दिनांक किंवा मुदतवाढ मागण्याचे कारण उद्‌भवल्याचा दिनांक, यापैकी जो आधी असेल, त्या दिनांकापासून 15 दिवस संपण्यापूर्वी कार्यकारी अभियंत्याकडे लेखी अर्ज करील आणि कार्यकारी अभियंता त्याच्या मते मुदतवाढ देण्यास पुरेसे कारण असल्यास त्याला आवश्यक किंवा योग्य वाटेल तेवढी मुदतवाढ देईल. याबाबतीत कार्यकारी अभियंत्याचा निर्णय अंतिम असेल.

अंतिम प्रमाणपत्र

खंड 7 :- बांधकाम पूर्ण झाल्यानंतर कार्यकारी अभियंत्याकडून (त्यास यापुढे प्रभारी अभियंता असे म्हटले आहे.) त्याबद्दल कंत्राटदाराला एक प्रमाणपत्र देण्यात येईल, परंतु ज्या जागेवर बांधकाम करण्यात आले असेल तेथून सर्व मचाणसामान, शिलकी सामान व कचरा हलवल्याखेरीज आणि ज्या इमारतीमध्ये किंवा ज्या जागेवर बांधकाम करण्यात आले असेल किंवा बांधकाम पार पाडण्यासाठी त्याने जिचा ताबा घेतला असेल अशा इमारतीचे सर्व लाकूडकाम, दारे, खिडक्या, भिंती, तळजमीन किंवा इतर कोणतेही भाग यावरील घाण साफ केल्याखेरीज किंवा अभियंत्याकडून कामाची मोजमापे घेण्यात येईपर्यंत किंवा दुय्यम कर्मचाऱ्यांनी मोजमापे घेतलेली असल्यास, प्रभारी अभियंता कंत्राटदारावर बंधनकारक व त्याच्याविरुध्द निर्णायक असलेली उक्त मोजमापे मंजूर करीपर्यंत असे प्रमाणपत्र देण्यात येणार नाही किंवा काम पूर्ण झाले असल्याचे मानण्यात येणार नाही. कंत्राटदाराने काम पूर्ण करण्यासाठी निश्चित केलेल्या दिवशी किंवा त्यापूर्वी या खंडानुसार आवश्यक असलेल्या मचाणसामान, शिलकी सामान व कचरा हलवणे, घाण साफ करणे, यासारख्या आवश्यक गोष्टींचे अनुपालन करण्यात कसूर केल्यास, प्रभारी अभियंता कंत्राटदाराच्या खर्चाने असे मचाणसामान, शिलकी सामान व कचरा हलवील आणि त्याला योग्य वाटेल त्याप्रमाणे त्यांची विल्हेवाट लावील व पूर्वी सांगितल्याप्रमाणे अशी घाण साफ करील आणि कंत्राटदार अशाप्रकारे केलेल्या खर्चाची सर्व रक्कम ताबडतोब भरील. परंतु असे पूर्वी सांगितलेले कोणतेही मचाणसामान किंवा शिलकी सामान यांच्याबाबतीत त्यांच्या विक्रीव्दारे प्रत्यक्षतः वसूल झालेल्या रकमेव्यतिरिक्त त्याला काहीही मागणी करता येणार नाही.

* आवश्यक नसेल ते खोडून टाकावे.

(9)

खंड 8 :- एक हजार रूपयापेक्षा कमी अंदाजित खर्च असलेल्या कोणत्याही बांधकामाकरीता सर्व बांधकाम पूर्ण होऊन पूर्तता प्रमाणपत्र मिळेपर्यंत कोणतीही रक्कम देण्यात येणार नाही. परंतु एक हजार रुपयाहून अधिक अंदाजित खर्च असलेल्या बांधकामाच्या बाबतीत कंत्राटदाराला प्रभारी अभियंत्यानी त्यावेळी मंजूर व सम्मत केलेल्या बांधकामाच्या भागाच्या प्रमाणानुसार त्यासाठी मासिक बिल सादर केल्यानंतर रक्कम मिळण्याचा हक्क राहील, अभियंत्याचे अशा मंजूरीबाबतचे व अशा प्रकारे देय असलेली रक्कम संमत करण्याबाबतचे प्रमाणपत्र अंतिम व कंत्राटदाराविरुध्द निर्णायक राहील अशी सर्व मध्यंतरीची प्रदाने ही प्रत्यक्षतः पार पाडलेल्या आणि पूर्ण केलेल्या कामाबद्दलची प्रदाने मानण्यात येणार नाहीत. तर फक्त अंतिम प्रदानाची अग्रिमे म्हणून मानण्यात येतील आणि त्याच्यामुळे कोणतेही संदोष, डळमळीत, अपूर्ण किंवा अकुशल बांधकाम हलवण्याचे किंवा काढून टाकण्याचे व त्याची पुनर्रचना किंवा पुन्हा उभारणी करण्याचे आदेश अभियंत्याला देता देणार नाहीत असे होणार नाही किंवा असे प्रदान म्हणजे कोणत्याही बाबतीत कंत्राट किंवा त्याचा कोणताही भाग ठरलेल्या दिवशी पूर्ण झाल्याची किंवा कोणतीही मागणी प्रोद्भत होत असल्याचा स्वीकृत मानण्यात येणार नाही किंवा त्यामुळे हिशेब अंतिमरित्या चुकते करणे किंवा त्याचे समायोजन किंवा अन्यथा अभियंत्याच्या बाबतीतील शक्ती समापित वा रद्द होणार नाहीत व बाधित होणार नाहीत किंवा त्यामुळे कंत्राटामध्ये कोणत्याही प्रकारे बदल होणार नाही किंवा त्यावर परिणाम होणार नाही. कंत्राटदार काम पूर्ण करण्यासाठी निश्चित केलेल्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत अंतिम बिल सादर करील अन्यथा बांधकामाची मोजमापे आणि त्याबद्दल देय असलेली एकूण रक्कम याबद्दलचे अभियंत्याचे प्रमाणपत्र अंतिम व संबंधित व्यक्तीवर बंधनकारक राहील.

आगाऊ रकमा म्हणून समजावयाची मध्यंतरीच्या प्रमाणपत्रावरील प्रदाने

पुर्ण झाली असे मान्य न केलेल्या बांधकामासंबंधी अभियंत्याच्या स्वेच्छा निर्णयानुसार कमी दराने करावयाची प्रदाने

खंड 9 :- रू.1,000 पेक्षा अधिक अंदाजित खर्च असलेल्या निरनिराळया बाबीचे दर त्या बाबी मंजूर विनिर्देशानुसार सर्वतोपरी पूर्ण करण्यात आल्या असल्याचे मान्य झाल्यानंतरच ग्राह्य ठरवतील. बांधकामाच्या बाबी पूर्ण झाल्या असल्याचे मानले नसेल अशा प्रकरणामध्ये अभियंत्याने अंतिम किंवा लेख्यावरील बिले तयार करताना त्याला वाजवी वाटतील अशा कमी केलेल्या दरांनी अशा बाबींच्या संबंधातील प्रदाने करावीत.

दरमहा सादर करावयाची बिले.

खंड 10 :- आधीच्या महिन्यामध्ये पार पाडलेल्या सर्व कामाबद्दलचे बिल कंत्राटदार दरमहा अभियंत्याने ठरवून दिलेल्या दिवशी किंवा त्यापूर्वी सादर करील आणि त्याची पडताळणी करण्यासाठी अभियंता आवश्यक ती मोजमापे घेईल किंवा घ्यावयास लावील आणि बिल सादर केल्यापासून शक्य असल्यास दहा दिवसाच्या आत मागणीचे ती अनुज्ञेय असेल त्या मर्यादेपर्यंत समायोजन करील. पूर्वी सांगितल्याप्रमाणे ठरवून दिलेल्या कालावधीत कंत्राटदाराने बिल सादर न केल्यास कंत्राटदार किंवा ज्यांची मोजमापाच्या सूचीवरील प्रतिस्वाक्षरी पुरेशी खात्री देणारी असेल, असा त्याचा रीतसर प्राधिकृत केलेला प्रतिनिधी याच्या समक्ष उक्त कामाची मोजमापे घेण्यासाठी अभियंता एक दुय्यम कर्मचारी नियुक्त करील आणि अभियंता अशा सूचीवरून कंत्राटदारावर सर्व बाबतीत बंधनकारक असणारे बिल तयार करील.

बिले मुद्गित नमुन्यामध्ये असणे.

जि. प.चे. पुरवायाचे सामान.

खंड 11 :- कंत्राटदार सर्व बिले प्रभारी अभियंत्याच्या कार्यालयाकडे अर्ज करुन प्राप्त करावयाच्या मुद्गित नमुन्यामध्ये सादर करील. बिलामध्ये आकारावयाच्या सर्व खर्चाची नोंद नेहमी निविदेमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दरानुसार केलेली असेल किंवा या शर्तीच्या अनुषंगाने आदेश दिलेल्या किंवा निविदेमध्ये नमुद न केलेल्या किंवा तरतुद न केलेल्या कोणत्याही जादा बांधकामाच्या बाबतीत अशा बांधकामासाठी यापुढे तरतुद केलेल्या दरानुसार केलेली असेल.

खंड 12 :- जर बांधकामाच्या विनिर्देशामध्ये किंवा अंदाजामध्ये जि.प.बांधकाम/ल.पा. विभागाच्या भांडारातून पुरवावयाच्या विशेष वर्णनाच्या सामग्रीच्या वापरासाठी तरतुद, केलेली असेल किंवा जर अभियंत्याने पुरवावयाचे विशिष्ट सामान कंत्राटदाराने वापरावे असे फर्माविण्यात आले असेल (यात यापुढे नमूद केल्याप्रमाणे अशी सामग्री आणि सामान व त्याकरीता आकारावयाच्या किंमती या, याला जोडलेल्या अनुसूचिमध्ये किंवा ज्ञापनामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या या कंत्राटाचा अर्थ किंवा प्रभाव यावर कोणत्याही प्रकारे नियंत्रण करणाऱ्या नसून कंत्राटदाराच्या सोयीसाठी व्यवहार्य अशा असतील) तेव्हा फक्त कंत्राटाच्याच प्रयोजनार्थ वापर करण्यासंबधी कंत्राटदाराला वेळोवेळी

(10)

आवश्यक असेल त्याप्रमाणे सामग्री व सामान त्याला पुरविण्यात येईल आणि अशा प्रकारे पुरवण्यात आलेल्या सामग्रीच्या व सामानाच्या संपूर्ण परिमाणाची किंमत, या कंत्राटांन्वये किंवा अन्यथा त्यावेळी देय असलेल्या किंवा त्यानंतर देय होणाऱ्या कोणत्याही रकमांमधून किंवा प्रतिभूति ठेवीमधून किंवा तिच्या उत्पन्नामधून कमी किंवा वजा करण्यात येईल. प्रतिभूति ठेव जि.प. च्या प्रतिभूतिच्या स्वरूपात असल्यास त्याबाबतीत सर्व प्रयोजनार्थ ती किंवा तिचा पुरेसा भाग विकण्यात येईल. कंत्राटदाराला पुरवण्यात आलेली सर्व सामग्री जि.प.ची अबाधित संपदा राहील. व कोणत्याही कारणासाठी ती बांधकामाच्या जागेवरून हलविता येणार नाही. व अभियंत्याला कोणत्याही वेळी तीची तपासणी करता यावी म्हणून ती सर्वकाळ खुली असेल. कंत्राटदाराच्या परिपूर्तीच्या किंवा समाप्तीच्यावेळी न वापरलेली व पूर्णपणे चांगल्या स्थितीत असलेली अशी कोणतीही सामग्री, अभियंत्याने त्याच्या सहीनिशी दिलेल्या लेखी नोटीशीव्दारे तसे करण्याबद्दल फर्माविल्यास जि.प. च्या बांधकाम / ल.पा. विभागाच्या भांडाराकडे परत पाठविण्यात येईल. परंतु अभियंत्याच्या संमत्तीशिवाय अशी कोणतीही सामग्री परत करण्याचा हक्क कंत्राटदाराला असणार नाही. व पूर्वी सांगितल्याप्रमाणे त्याला पुरवण्यात आलेल्या परंतु त्याने वापर न केल्यामुळे शिल्लक राहिलेल्या अशा कोणत्याही सामग्रीबद्दल किंवा अशा कोणत्याही सामग्रीचा काहीही अपव्यय किंवा हानी झाल्यास त्याबद्दल भरपाईची मागणी करता येणार नाही.

विनिर्देश, आरेखने, आदेश इत्यादीनुसार पार पाडावयाची बांधकामे.

खंड 13 :- विनिर्देशानुसार सामग्री व इतर प्रत्येक बाब ठेवून कंत्राटदार,संपूर्ण बांधकाम व त्याचा प्रत्येक भाग अत्यंत भरीव स्वरूपात व कुशलतापूर्वक पार पाडील. प्रभारी अभियंत्याने स्वाक्षरी केलेली व त्याच्या कार्यालयामध्ये दाखल केलेली संकल्प चित्रे,आरेखने आणि लेखी अनुदेश यांचेदेखील तंतोतंतपणे, संपूर्णपणे व यथातथ्य पालन करील. कंत्राटदाराला अशा कार्यालयामध्ये किंवा कार्यालयाच्या वेळेमध्ये बांधकामाच्या जागी ही संकल्प चित्रे,आरेखने इत्यादी निरिक्षणासाठी मिळण्याचा हक्क राहील. कंत्राटदाराला कंत्राटाविषयक आरेखने व चालू आरेखने याचे तीन संच तसेच स्विकृत निविदेची एक प्रमाणित प्रत कार्यादेशासह विनामुल्य मिळण्याचा हक्क राहील. कंत्राटाविषयक आरेखने व कामचलाऊ आरेखने यांच्या खेरीज आणखी प्रती त्याला पाहिजे असल्यास अन्यथा विनिर्दिष्ट केले असेल त्या व्यतिरिक्त कंत्राटविषयक आरेखनाच्या प्रत्येक संचाला रु.10 व कामचलाऊ आरेखनाला प्रत्येकी रु. 1 या दराने त्या त्याला पुरविण्यात येतील.

विनिर्देश व संकल्पचित्रे यामधील फेरफारामुळे संविदा अग्राह्य ठरणार नाही.

खंड 14 :- अभियंत्याला काम चालू असताना मूळ विनिर्देश, आरेखने, संकल्प चित्रे आणि अनुदेश यामध्ये त्याला आवश्यक किंवा उचित वाटतील असे फेरफार करण्याची किंवा त्यामध्ये भर घालण्याची शक्ती राहील. आणि अभियंत्याच्या सहीने त्याला या बाबतीत दिलेल्या कोणत्याही लेखी अनुदेशानुसार बांधकाम पार पाडणे कंत्राटदारावर बंधनकारक राहील आणि अशा फेरफारामुळे संविदा अग्राह्य ठरणार नाही. वर विनिर्दिष्ट केलेल्या पद्धतीने बांधकामाचा भाग म्हणून पार पाडण्यासाठी कंत्राटदाराला निदेश दिलेले कोणतेही जादा काम कंत्राटदाराने सर्व बाबतीत ज्या शर्तीवर प्रमुख बांधकाम करण्याचे कबुल केले असेल त्या शर्तीवर आणि प्रमुख बांधकामाच्या निविदेमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दरांनीच पार पाडले पाहिजे आणि या कंत्राटामध्ये ज्या करीता कोणताही दर विनिर्दिष्ट केलेला नसेल असे इतर कोणत्याही प्रकारचे बांधकाम जादा आणि फेरफार केलेल्या कामामध्ये समविष्ट असेल तर अशा प्रकारचे बांधकाम विभागाच्या दर अनुसूचीमध्ये नोंदलेले दर किंवा अभियंता आणि कंत्राटदार यांनी परस्पर ठेवलेले दर, यापैकी जे कमी असतील त्या दरांनी पार पाडण्यात येईल. ज्या करीता विभागाच्या दर अनुसूचीमध्ये कोणतेही दर नोंदलेले नाहीत असे जादा किंवा फेरफार केलेले बांधकाम पार पाडण्याचे आदेश, दरांबद्दल एकमत होण्यापूर्वी देण्यात आले असतील तेथे कंत्राटदार त्याला बांधकाम पार पाडण्याचा आदेश मिळाल्याच्या दिनांकापासून सात दिवसांच्या आत अशा प्रकारच्या बांधकामाकरिता त्याला जो दर आकारावयाचा असेल तो अभियंत्याला कळवील आणि अभियंत्याला हा दर मान्य न झाल्यास अशा प्रकारचे बांधकाम पार पाडण्याबाबत आपला आदेश लेखी नोटीस काढून रद्द करण्याचे आणि त्याला उचित वाटेल अशा पध्दतीने ते पार पाडण्याची व्यवस्था करण्याचे स्वातंत्र्य त्याला राहील. मात्र, यात शेवटी उल्लेखिल्याप्रमाणे दर नमूद केले जाण्यापूर्वी, कंत्राटदाराने बांधकामास प्रारंभ केला असेल किंवा त्यासंबंधात काही खर्च केला असेल तर अशा बाबतीत पूर्वी सांगितल्याप्रमाणे दर निश्चित केल्याचे दिनांकापूर्वी त्यांनी पार पाडलेल्या बांधकामाबद्दल किंवा केलेल्या खर्चाबद्दल अभियंता निश्चित करील. अशाच दराने किंवा दरांनीच पैसे मिळण्याचा त्याला हक्क राहील. याबाबत वाद निर्माण झाल्यास जि.प. मु.का.अ. यांचा निर्णय अंतिम राहील.

अंदाजामध्ये समाविष्ठ न केलेल्या बांधकामाकरीता जिल्ह्याच्या दर अनुसूचीचे दर.

(11)

तथापी कंत्राटदाराने शिफारस केलेली आणि सक्षम प्राधिकाऱ्याने स्विकारलेली संकल्प चित्रे, आरेखने व विनिर्देश यानुसार बांधकामाची अंमलबजावणी करावयाची असेल तेव्हा, उपरिनिर्दिष्ट फेरफार निविदेला जोडलेली अशी सकंल्पचित्रे, आरेखने व विनिर्देश यांच्या पुरतेच मर्यादित राहतील.

भर किंवा फेरफार यांच्या परिणामी मुदतवाढ

फेरफार किंवा भर यामुळे बांधकामाच्या खर्चात झालेल्या वाढीचे मूळ कंत्राटाच्या बांधकामाच्या खर्चाशी जे प्रमाण असेल त्याच प्रमाणात बांधकाम पूर्ण करणे कालमर्यादा वाढवून देण्यात येईल आणि अशा प्रमाणाबाबतचे अभियंत्याचे प्रमाणपत्र निर्णायक राहील.

बांधकामामधील फेरफार किंवा निर्बंध याबद्दल प्रदान किंवा भरपाई यासाठी मागणी करता येणार नाही.

खंड 15 :- 1) संविदेचे कागदपत्र निष्पादित करून दिल्यानंतर कोणत्याही एखादया कारणासाठी अभियंत्यास निविदेमध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे संपूर्ण बांधकाम किंवा त्याचा कोणताही भाग, यांचे काम कोणत्याही कालावधीसाठी थांबविणे आवश्यक वाटल्यास किंवा कंत्राटदाराने संपूर्ण बांधकाम किंवा त्याचा भाग अजिबात पार पाडण्याचीच किंवा पार न पाडण्याची आवश्यकता आहे असे वाटल्यास त्याबाबत तो कंत्राटदाराला लेखी नोटीस येईल त्यांनतर कंत्राटदार बांधकामाचे यथास्थिती, संपूर्णपणे किंवा अंशतः निलंबन करील किंवा अंशतः थांबविल. अशा कोणत्याही प्रकरणामध्ये याखाली तरतूद केलेल्या बाबी वगळून इतर बाबतीत कंत्राटदाराला ते काम पूर्णपणे पार पाडल्यामुळे मिळाला असता परंतु काम संपूर्णपणे पार न पाडल्यामुळे त्याला मिळाला नाही. असा कोणताही नफा किंवा फायदा याबद्दल किंवा खरेदी केलेल्या किंवा खरेदी करण्याबद्दल करार झालेल्या सामग्रीमुळे किंवा त्याने भरती केलेल्या मजूरांच्या बेकारीमुळे त्याला सोसाव्या लागलेल्या अशा कोणत्याही हानी बद्दल कोणतेही प्रदान किंवा भरपाई मिळण्यासाठी मागणी करता येणार नाही तसेच, ज्यांच्यामुळे मूलतः योजलेल्या बांधकामामध्ये काटछाट होणार असेल असे काही फेरफार मूळ विनिर्देश, आरेखने, संकल्पचित्रे आणि अनुदेश यामध्ये करण्यात आले आहेत. या कारणामुळे त्याला भरपाईसाठी कोणतीही मागणी करता येणार नाही तथापि उक्त नोटिस कंत्राटदाराला मिळण्यापूर्वीच त्याने सामग्री खरेदी केली असेल किंवा खरेदी करण्याचा करार केला असेल तेव्हा अभियंत्याने ठरवून दिलेल्या दरांनी अशा सामग्रीबद्दल कंत्राटदाराला प्रदान करण्यात येईल मात्र ही सामग्री आवश्यकतेपेक्षा अधिक नसेल व मान्य प्रतीची असेल आणि/ किंवा त्यांने खरेदी करण्याबाबत करार केला असेल अशा सामग्रीच्या बाबतीत त्याला काही हानी सोसावी लागल्यास त्याबद्दल भरपाई देण्यात येईल अशा भरपाईची रक्कम प्रभारी अभियंत्याने निश्चित करावयाची असून त्याचा निर्णय अंतीम राहील. या खंडानुसार काम थांबविण्यासंबंधी आदेश देण्यात आले असतील अशा कालावधीमध्ये कामगारांना मजूरी दयावी लागल्यामुळे कंत्राटदाराला काही हानी सोसावी लागल्यास कंत्राटदाराला त्याने तसा अर्ज केल्यानंतर ज्याचा निर्णय अंतिम असेल अशा अभियंत्याला योग्य वाटेल ती मजूरीबद्दलची भरपाई मिळण्याचा हक्क राहील. मात्र यापूर्वी सांगितल्याप्रमाणे काम थांबविण्यासंबंधी आदेश देण्यात आलेल्या संपूर्ण कालावधीकरीता किंवा त्याच्या काही भागाकरीता कंत्राटदाराला त्यांचे कामगार इतरत्र कामावर लावता आले असते असे अभियंत्याचे मत असल्यास कंत्राटदाराला मजूरीबद्दल कोणतीही भरपाई मिळण्याचा हक्क असणार नाही.

2) पूर्वी सांगितल्याप्रमाणे काम थांबविण्याच्या आदेशाचा कालावधी 90 दिवसापेक्षा जास्त चालू राहिला तर उरलेल्या कामाच्या बाबतीत जी त्याच्यावर बंधने असतील त्यातून अंग काढून घेण्यास कंत्राटदार मुक्त राहील. मात्र त्याने 90 दिवसांच्या कालावधी संपण्याच्या 30 दिवसांमध्ये अभियंत्याला 10 दिवस आगावू तशा आशयाचे व अभियंत्याने झालेल्या कामाचे मोजमाप करून देयक देण्याविषयी सुचना दिली पाहिजे अशा प्रकारे नोटीस दिल्यानंतर कंत्राटदार अपूर्ण राहिलेल्या कामाची पूर्तता करण्याच्या बंधनातून मुक्त केला जाईल. अशा सुचना मिळाल्यावर अभियंता कामाचे मोजमाप करण्याचे काम पूर्ण करण्याच्या दिशेने व सुचना मिळाल्यापासून 90 दिवसांचे आत कंत्राटदाराने पूर्ण केलेल्या कामाची देय रक्कम देण्याच्या दृष्टिने कार्यरत होईल अशा प्रकारे पैसे दिल्यावर कोणत्याही प्रकारे खंडाच्या उरलेल्या तरतुदीनुसार कंत्राटदाराच्या पुढील नुकसान भरपाईच्या अधिकाराला बाधक ठरणार नाही.

3) अभियंता तीस दिवसापेक्षा जास्त व एकूण साठ दिवसापर्यंत कालावधीकरीता कंत्राटदाराने काम बंद ठेवण्याची आवश्यकता भासली तर असे काम थांबून पुन्हा काम सुरु केल्यापासून तीस दिवसाच्या आत कंत्राटदाराला सदर कालावधीत यंत्रसामुग्री तशीच पडून राहिल्याने, त्यांनी कामावर घेतलेल्या कामगारांचा पगार घ्यावा लागल्याने त्यांचे जे आर्थिक नुकसान झाले असेल त्याची भरपाई

(12) मागण्याचा अधिकार आहे. मात्र यंत्रसामुग्री पगार, मजूर यांची नुकसान भरपाई सलग किंवा एकूण 30दिवसांच्या कालावधीकरीता मिळणार नाही किंवा अशा प्रकारचे काम थांबणे किंवा कोणत्याही प्रकारचे काम असमाधानकारक कामामुळे किंवा कामातील त्याच्या दोषामुळे काम थांबविले गेले असेल तर भरपाई मिळणार नाही याबाबतीतला अभियंत्याचा निर्णय हा कंत्राटदाराच्यादृष्टिने अंतिम व निर्णायक राहील. पुढील बाबतीत शासनाकडून सामान पुरविणेस विलंब झालेस भरपाईची मागणी करता येणार नाही.

4) ज्यावेळी

1) उपखंड 1 अन्वये अभियंत्याने पूर्णपणे काम थांबविण्याची सूचना दिली असेल.

2) 90 दिवसापेक्षा जास्त कालावधीकरीता काम थांबविले गेले असेल आणि कंत्राटदाराने उपखंड

2) अन्वये कंत्राटाच्या उरलेले काम पूर्ण करून देण्याच्या बंधनातून सुटका करून घेतली असेल

किंवा

3) खंड 14 (1) च्या सुचनेप्रमाणे कामाची व्याख्या, ड्रॉईंग, डिझाईन किंवा सूचना यामध्ये बदल झाल्याने कामाच्या निविदेमध्ये अगोदर नमूद केलेल्या नगामध्ये कामातील बदल, काम गाळणे किंवा ऐवजी दुसरा नग दर्शविणे, अशा प्रकारे कपात झाली असेल - कामाचे आकारमान किंमत यामध्ये होणारी कपात निविदेमध्ये सुचविल्या गेल्या नगांच्या संदर्भात 25% पेक्षा जास्त असेल व रूपये 5,000/- पेक्षा जास्त असेल.

जि. प. कडून सामग्रीचा पुरवठा करण्यात विलंब झाल्यामुळे झालेल्या हानी-बद्दल भरपाईची मागणी करता येणार नाही.

90 दिवसामध्ये (1) काम थांबविण्याची सूचना दिल्यापासून(2) सतत काम बंद असल्याने कंत्राटदार बंधनकारक बाबीतून मुक्त होण्याविषयी सूचना दिल्यापासून (3) खंड 14 (1) प्रमाणे कामात कपात झाली असेल तर कंत्राटातील काम पूर्ण करण्यासाठी खरेदी केलेले किंवा खरेदी करावयाचे मान्य केलेले साहित्य यांची समाधानकारक देयके अभियंत्याला सादर करावी लागतील. काम पूर्णतः थांबविण्याच्या किंवा तात्पुरते थांबविण्याचे किंवा कामात कपात केल्याची सूचना मिळण्यापूर्वी जि.प.ने पैसे देवून विकत घ्यावयाच्या अशा प्रकारच्या साहित्याची भरपाई अभियंत्याने ठरविलेल्या दराने होईल, मात्र हे दर कोणत्याही प्रकारे कंत्राटदाराने मागणी केल्यापेक्षा जास्त असणार नाही असे दिलेले साहित्य जि.प. आपल्या ताब्यात घेईल निविदेच्या अपूर्ण कामांच्या आवश्यकतेपेक्षा ते साहित्य जास्त असता कामा नये आणि अभियंत्याने ठरविलेल्या गुणवत्ता व निकष त्या साहित्याला लागू असतील.

खंड 15 अ :- कंत्राटदारांस -

(एक) रेल्वेवाघीणींच्या पुरवठयासंबंधीच्या अडचणी

(दोन) दैवी शक्ती,

(तीन) दैवी आपत्ती

(चार) जि.प.च्या शत्रूची कृत्ये किंवा शासनाच्या नियंत्राबाहेरील असे इतर कोणतेही वाजवी

कारण

अकल्पित मागण्याकरिता कालमर्यादा.

यामुळे उद्‌भवलेल्या विलंबामुळे अनुसूचि 'अ' मध्ये नोंद केलेल्या सामग्रीचा पुरवठा करण्यात जि.प. कडून विलंब झाल्यामुळे सोसाव्या लागलेल्या हानीबद्दल जि.प.कडे भरपाईची मागणी करण्याचा हक्क असणार नाही.

काम सदोष झाले असता करावयाची कार्यवाही व देय भरपाई.

सामग्रीचा पुरवठा करण्यात अशा प्रकारचा विलंब झाल्यास काम पूर्ण करण्यासाठी जि.प. त्याप्रकरणाच्या परिस्थितीनुरूप कार्यकारी अभियंत्याला योग्य वाटेल ती मुदत वाढ देईल मुदत वाढीच्या संबंधात कार्यकारी अभियंत्याने दिलेला निर्णय हा कंत्राटदाराकडून अंतिम म्हणून स्विकारण्यात येईल.

खंड 16 :- कंत्राटदाराने, अशा मागणीचे कारण उद्‌भवल्यापासून एक महिन्याच्या आत लेखी मागणी अभियंत्याकडे सादर केलेली असल्याखेरीज कंत्राटदाराला कोणत्याही परिस्थितीमध्ये कोणत्याही कारणासाठी जि.प. कडून कोणतीही भरपाई मिळण्याचा हक्क असणार नाही.

टिप : ई मध्ये नमुद केलेल्या निविदेमध्ये प्रमाणेच ही टक्केवारी असेल.

खंड 17 :- प्रतिभूति ठेव कंत्राटदाराला परत करण्यापूर्वी कोणत्याही वेळी अभियंत्याला किंवा कामाच्या प्रभारी असलेल्या त्यांच्या दुय्यम अधिकाऱ्याला असे आढळून आले की, कोणतेही बांधकाम डळमळीत, सदोष किंवा अकुश कारागिरीचे किंवा निकृष्ट प्रतीची सामग्री वापरून केलेले आहे किंवा

काम पार पाडण्यासाठी त्यांनी पुरविलेली कोणतीही सामग्री किंवा वस्तू हलक्या प्रतीच्या किंवा करारात अंतर्भूत केलेल्या पेक्षा निकृष्ट प्रतीच्या आहेत किंवा अन्यथा ते कंत्राटानुसार केलेले नाही तर प्रभारी अभियंत्याने ही गोष्ट कंत्राटदाराला लेखी कळविणे कायदेशीर ठरले आणि त्यानंतर ज्या बद्दल तक्रार करण्यात आलेली असेल असे बांधकाम, सामग्री किंवा वस्तू नजर चूकीने पास व प्रमाणित केलेली असेल व त्याबद्दलचे प्रदान केलेले असेल तरी देखील कंत्राटदार, आवश्यक असेल त्याप्रमाणे अशा प्रकारे विनिर्दिष्ट केलेले बांधकाम यथास्थित पूर्णतः किंवा अंशतः ताबडतोब दुरुस्त करण्यास काढून टाकण्यास किंवा त्याची पूर्णरचना करण्यास किंवा ते फर्माविण्यात आल्यास अशा प्रकारे विनिर्दिष्ट केलेली किंवा पुरविलेली सामग्री किंवा वस्तू हलविण्यास व त्याच्या स्वतःच्या खर्चाने योग्य व उचित सामग्री पुरविण्यात बांधील राहील आणि पूर्वोक्त, लेखी सूचनांमध्ये अभियंत्याने विनिर्दिष्ट करावयाच्या कालावधीच्या आत कंत्राटदाराने तसे करण्यास कसूर केल्यास तशी कसूर केल्यापासून दहा दिवसापेक्षा अधिक नसेल इतक्या कालावधीमध्ये प्रत्येक दिवसाकरीता अंदाजित रक्कमेवर एक टक्का या दराने भरपाई देण्यास तो पात्र असेल आणि अशा कोणत्याही कसूरीच्या प्रकरणी अभियंता सर्वस्वी कंत्राटदाराच्या जोखमीवर व त्याच्या खर्चाने यथास्थिती बांधकाम दुरूस्त करील. ते काढून टाकील किंवा त्यांची पूर्नबांधणी करील किंवा तक्रार करण्यात आलेली सामग्री किंवा वस्तू हलवून त्याजागी नविन सामग्री किंवा वस्तू पुरविल. वर वर्णन केलेले अशा प्रकारचे कोणतेही काम किंवा सामग्री स्विकारण्यात यावा किंवा त्याचा / तिचा उपयोग करण्यात यावी असे अभियंत्याला वाटल्यास, तो त्याकरीता निश्चित करील अशा कमी केलेल्या दरांनी ती स्विकारने हा त्यांचा स्वेच्छनिर्णय राहील.

बांधकामे निरिक्षणासाठी खुली असावीत.

खंड 18 :- सुचनानुसार कार्यवाहीखालील किंवा काम चालू असलेले किंवा काम पार पाडलेले सर्व बांधकामे नेहमी अभियंता आणि त्यांचे दुय्यम अधिकारी यांच्या निरिक्षणासाठी व पर्यवेक्षणासाठी खुली ठेवण्यात येतील आणि नेहमीच्या कामाच्या वेळेत व अभियंत्याची किंवा त्यांच्या दुय्यम अधिकाऱ्याची बांधकामांना भेट देण्याबद्दलच्या त्यांच्या उद्देशाची पुरेशी सूचना मिळेल त्या इतर सर्व वेळी कंत्राटदार आदेश व सूचना घेण्यासाठी स्वतः उपस्थित राहील किंवा रितसर लेखी अधिकृत केलेला त्याचा जबाबदार अभिकर्ता उपस्थित राहील अशी व्यवस्था करील. कंत्राटदार, रितसर प्राधिकृत केलेल्या अभिकर्त्याला देण्यात आलेल्या आदेशांचा प्रभाव व परिणाम जणू ते आदेश खुद्द कंत्राटदालाच देण्यात आलेले आहेत अशा स्वरूपाचा समजण्यात येईल.

बांधकाम आच्छादण्यापूर्वी नोटिस देण्यात यावी.

खंड 19 :- कोणतेही बांधकाम आवृत्त करण्यापूर्वीच किंवा त्याची मोजमापे घेणे शक्य होणार नाही असे करण्यापूर्वीच बांधकाम मागण्यासाठी व याची अचूक मोजमापे घेण्यासाठी कंत्राटदार, बांधकाम अशाप्रकारे आच्छादण्यापूर्वी किंवा अन्यथा कोणत्याही कामाची मोजमापे घेणे शक्य होणार नाही असे करण्यापूर्वी अभियंत्यास किंवा त्यांच्या प्रभारी असलेल्या दुय्यम अधिकाऱ्याला पाचपेक्षा कमी नसतील इतक्या दिवसाची नोटीस देईल आणि अभियंत्याच्या किंवा बांधकामाचा प्रभारी असलेल्या त्याच्या दुय्यम अधिकाऱ्याच्या लेखी संमतीखेरीज कोणतेही बांधकाम आच्छादित करणार नाही किंवा त्यांची मोजमापे घेणे शक्य होणार नाही असे करणार नाही आणि नोटीस देण्यात आली असल्याखेरीज किंवा अशी संमती मिळविण्यात आली असल्याखेरीज कोणतेही बांधकाम आच्छादित करण्यात आले किंवा त्यांची मोजमापे घेता येणार नाही असे करण्यात आले तर, ते आच्छादन कंत्राटदाराच्या खर्चाने परत काढून टाकले जाईल आणि तसे न केल्यास अशा बांधकामासाठी किंवा जिच्या सहाय्याने ते पार पाडले त्या सामग्रीसाठी कोणतेही प्रदान किंवा भत्ता देण्यात येणार नाही.

प्रमाणपत्र दिल्यानंतर तीन महिन्यापर्यंत कामातील अपुर्णता व नुकसान याविषयी कंत्राटदार जबाबदार राहील.

खंड 20 :- बांधकाम चालू असताना ज्या इमारतीत कंत्राटदार व त्यांचे कामगार किंवा नोकर काम करीत असतील त्या इमारतीचा कोणताही भाग किंवा ते बांधकाम किंवा त्यांच्या कोणत्याही भागाचे काम ज्या जागेत करण्यात येत असेल त्या जागेच्या लगतचा रस्ता, कुंपण,गवताळी जमीन किंवा शेतजमीन यांची त्यांच्याकडून मोडतोड, निरूपण, क्षति किंवा नाश झाल्सास किंवा बांधकाम चालू असताना कोणत्याही कारणाने कोणतीही हानी पोहोचल्यास किंवा अभियंत्याने काम पूर्ण झाल्याचे अंतिम किंवा अन्य प्रमाणपत्र दिल्यानंतर एक वर्षाच्या आत कामामध्ये कोणतीही अपूर्णता दिसून आल्यास कंत्राटदार स्वतःच्या खर्चाने त्या दुरुस्त करील व त्याने तसे न केल्यास अभियंता इतर कामगारांकडून त्या दुरस्त करवून घेईल व येणारा खर्च (याबाबतीत अभियंत्याने प्रमाणपत्र अंतिम असेल) कंत्राटदाराला देय असलेल्या रकमेतून किंवा त्यानंतर त्याला देय होणाऱ्या कोणत्याही रकमेतून, प्रतिभूति ठेवीमधून किंवा तिच्या विक्रीपासून मिळणाऱ्या उत्पन्नामधून किंवा त्या रकमेच्या पुरेशा भागातून वजा करील.

(14)

संयंत्र, शिड्या, मचाणे, इ. कंत्राटदाराने पुरवावीत.

दिवे, कुंपण वगैरेची तरतूद न करण्यामुळे होणाऱ्या नुकसानीबद्दल तो जबाबदार असेल.

खंड 21 :- (कंत्राटानुसार बांधकाम विभागाच्या भांडाराकडून काही विशेष प्रकार सामग्री पुरवावयाची असल्यास अशा सामग्रीव्यतिरिक्त) संयंत्र,हत्यारे, उपयंत्रे,अवजारे, शिडया,दोरखंड,दोऱ्या,मचाण व तात्पुरत्या बांधकामासाठी आवश्यक असलेल्या किंवा बांधकाम योग्यप्रकारे पार पाडण्याच्या दृष्टिने मूळ, बदलेल्या किंवा पर्यायी स्वरूपाची योग्य वस्तू कंत्राटदार स्वतःच्या खर्चाने पुरवील मग त्या (वस्तू) विनिर्देशात किंवा संविदेचा एक भाग असलेल्या दस्त ऐवजात अंतर्भूत असोत किंवा नसोत किंवा या शर्तीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या असोत किंवा नसोत आणि या शर्तीनुसार ज्या गरजा पूर्ण करून घेण्याचा अभियंत्याला हक्क असेल अशा काणत्याही बाबतीत त्या गरजा पूर्ण करण्यासाठी किंवा भागविण्यासाठी आवश्यक असेल त्या सर्व सामग्रीची बांधकामाच्या ठिकाणापासून व तेथपर्यंत ने-आण करील. बांधकामाची मांडणी, बांधकामाची किंवा सामग्रीची मोजणी, वजन करण्यासाठी व कोणत्याही वेळी आणि वेळोवेळी मोजणी किंवा तपासणी करण्यात सहाय्य करण्यासाठी कंत्राटदार आवश्यक असणारी साधने व सामग्री यासह आवश्यक तितकी माणसे विनामूल्य पुरवील. त्याने तसे न केल्यास अभियंता कंत्राटदाराच्या खर्चाने त्याची तरतुद करील व संविदेनुसार कंत्राटदाराला देय असलेल्या कोणत्याही रकमेमधून किंवा त्याच्या प्रतिभूति ठेवींमधून त्या ठेवीच्या विक्रीपासून मिळणाऱ्या उत्पन्नामधून किंवा त्या ठेवीच्या पुरेशा भागांमधून हा खर्च वजा करील अपघातापासून लोकांचे रक्षण करण्याच्या दृष्टीने कंत्राटदार आवश्यक ते कुंपण घालील व दिव्याचंी व्यवस्था करील आणि वरील सावधगिरीच्या उपायामध्ये हयगय केल्यामुळे कोणत्याही व्यक्तीस इजा पोचून तिने केलेला प्रत्येक वाद कार्यवाही अगर इतर न्यायालयीन कार्यवाही, यांच्या बचावामुळे उद्भवणारा खर्च सोसण्याला अशा प्रकारचा वाद कार्यवाही किंवा न्यायालयीन कार्यवाही यामध्ये अशा प्रकारच्या निवाडयानुसार द्यावयाची किंवा कंत्राटदारांच्या संमतीने अशा व्यक्तीने तडजोडीबाबत कोणतीही मागणी केलेली नुकसान भरपाई व खर्च देण्यास कंत्राटदार बांधील राहील.

खंड 21- अ :- कंत्राटदार योग्य मचाणे व कामाचे चबुतरे,मार्गिका व जिने पुरविल व त्या संबंधातील पुढील नियमांचे अनुपालन करील :-

(अ) शिडयावरून किंवा इतर साधनांनी करता न येणाऱ्या कामाकरिता कामगारांना योग्य मचाणे पुरवण्यात यावीत.

(ब) (एक) जबाबदार व सक्षम व्यक्तीची देखरेख आणि (दोन) शक्य तो अशा प्रकारच्या बांधकामाचा पुरेसा अनुभव असलेले सक्षम कामगार असल्याखेरीज मचाण बांधता खाली घेता किंवा मोठया प्रमाणावर बदलता कामा नये.

(क) सर्व मचाणे व त्यांना जोडलेली उपयंत्रे व सर्व शिडया -

(एक) मजबूत सामग्रीपासून बनविलेली असतील.

(दोन) त्यांच्यावर पडणारे वजन व ताण सहन करण्याइतकी ती मजबूत असतील.

(तीन) ती योग्य स्थितीत ठेवण्यात येतील.

(ड) नेहमीच्या वापरामुळे मचाणांच्या कोणताही भाग विस्थापित होणार नाही अशा रीतीने बांधलेली असतील.

(ई) मचाणावर जास्त भार ठेवला जाणर नाही व शक्यतोवर मचाणाच्या सर्व बाजूवर सारखा भार असेल.

(फ) मचाणावर लिफटींग गिअर बसविण्यापूर्वी मचाणे व भक्कम मजबूत अशी उभारली आहेत याविषयी खात्री करून घेण्याची विशेष काळजी घेतलेली असेल.

(ग) ही मचाणे ठराविक काळाने कार्यक्षम व्यक्तीकडून तपासली जातील.

(ह) कामगारांना मचाणाचा वापर करण्याची परवानगी देण्यापूर्वी कंत्राटदार, त्यांच्या कामगारांनी मचाण उभे केले असो किंवा नसो या विनिर्दिष्ट केलेल्या नियमांचे पूर्ण अनुपालन होईल असे उपाय योजना असल्याची खात्री करून घेईल.

(आय) कामाचे चबुतरे, मार्गिका आणि जिने हे--

(एक) त्यांचा कोणताही भाग बेसुमार किंवा कमीजास्त प्रमाणात वाकणार नाही अशा प्रकारे बांधलेले असतील.

(दोन) चालू स्थितीत, काम करणाऱ्या व्यक्ती अडखळतील किंवा घसरतील असे धोके व्यवहार्य असतील इतपत कमी करण्याचा विचार करून बांधलेले अगर सुस्थितीत ठेवलेले असतील.

(15)

(तीन) त्यावर अनावश्यक अडथळे नसतील.

(जे) .......... (विनिर्दिष्ट करावे) पेक्षा अधिक ऊंचीचे कामाचे चबुतरे, मार्गिका कामाच्या जागा व जिने यांच्या बाबतीत -

(एक) सुरक्षिततेची पुरेशी हमी देणारी दुसरी उपाययोजना केलेली असल्याखेरीज अन्यथा कामाची प्रत्येक चबुतरा व प्रत्येक मार्गिका हे अगदी जवळ-जवळ असतील.

(दोन) कामाचा प्रत्येक चबुतरा व मार्गिका पुरेशी रुंद असेल, आणि

(तीन) कामाचा प्रत्येक चबुतरा, कामाची प्रत्येक जागा व प्रत्येक मार्गिका यांच्या भोवती योग्य प्रकारे कठडे घातलेले असतील.

(के) माणसे किंवा वाहने येण्याजाण्यासाठी व सामानाची ने-आण करण्यासाठी लागणारा वेळ व जागा सोडून इमारतीच्या मजल्यावरील किंवा कामाच्या चबुतऱ्यावरील प्रत्येक उघडया भागाजवळ, माणसे किंवा सामान पडू नये म्हणून योग्य ती व्यवस्था करण्यात आलेली असेल.

(एल) ........ पेक्षा अधिक ऊंचीच्या छपरावर माणसे कामास लावलेली असताना तेथून ती खाली पडण्याचा धोका असेल तेथे माणसे किंवा सामान खाली पडू नये म्हणून योग्य ती काळजी घेतलेली असेल.

(विहित करण्यात यावे)

(एम) मचाण किंवा चालू असलेल्या जागेवरून पडणाऱ्या सामानाचा माणसांना भार लागू नये म्हणून योग्य ती काळजी घेण्यात येईल.

(एन) कामाचे चबुतरे व कामाच्या इतर जागा यावर जाण्यासाठी सुरक्षित साधने पुरविण्यात येतील.

(ओ) मक्तेदारांनी कामगाराना किमान वेतन नियमानुसार वेतन देणेचे आहे.

खंड 21 ब :- कंत्राटदार स्वतः वापरावयाच्या उच्चलन उपयंत्राच्याबाबतीत पुढील नियमांचे अनुपालन करील.

(अ) उच्चलन यंत्रसामग्री, दोऱ्या व इतर जोडभाग, नांगरवाडा व आधार या गोष्टी :--

(एक) चांगल्या यांत्रिक रचनेच्या मजबूत साधनसामग्रीच्या व पुरेसा बळकट असाव्यात व त्यांच्यात नित्याचे दोष नसावेत, आणि

(दोन) त्यांची चांगली दुरूस्ती करून त्या चालू स्थितीत ठेवण्यात याव्यात.

(ब) सामान वर नेण्यासाठी किंवा खाली आणण्यासाठी किंवा टांगण्याचे साधन म्हणून वापरण्यात येणारा प्रत्येक दोर चांगल्या प्रतीचा व पुरेसा भक्कम असावा व त्यांच्यात नेहमीचे दोष नसावेत.

(क) उच्चलन यंत्रे व दोरखंड कामाच्या जागेवर उभे केल्यानंतर व त्याचा उपयोग करण्यापूर्वी त्याची तपासणी करावी व पुरेशी चाचणी घ्यावी व जि.प. ने विहित करावयाच्या कालांतराने त्याची फेरतपासणी करावी.

(ड) सामान वर किंवा खाली नेण्यासाठी टांगण्याचे साधन म्हणून वापरली जाणारी प्रत्येक साखळी, कडी, आकडा, फिरकी व कप्पीचा ठोकळा यांची ठराविक कालांतराने तपासणी करावी.

(इ) प्रत्येक यारी चालक किंवा उच्चलन उपयंत्र चालक योग्यप्रकारे अर्हताप्राप्त असावा.

(फ) ........... पेक्षा कमी वयाच्या कोणत्याही व्यक्तीकडे कोणत्याही उच्चलन उपयंत्रावर किंवा कोणत्याही मचाणावर नियंत्रण ठेवण्याचे किंवा यंत्रचालकाला बावटा दाखवण्याचे काम देऊ नये.

(ग) प्रत्येक उच्चलनयंत्र आणि वर व खाली नेण्यासाठी किंवा टांगून ठेवण्याचे साधन म्हणून वापरली जाणारी प्रत्येक साखळी,कडी,आकडा,खोडा,ठोकळा यांच्या बाबतीत, त्यांच्या सहाय्याने किती सामान सुरक्षितपणे नेता येते यांची पुरेशा साधनाव्दारे खात्री करून घ्यावी.

(ह) मागील विनियमात निर्देशित केलेले प्रत्येक उच्चलन यंत्र व सर्व गियर यांच्यावर किती सामान सुरक्षितपणे वाहून नेता येईल त्या वजनाची स्पष्ट नोंद असावी.

(आय) निरनिराळे वजन सुरक्षितपणे वाहून नेणाऱ्या उच्चलन यंत्राच्या बाबतीत त्याने सुरक्षितपणे वाहून न्यावयाचे प्रत्येक वजन व ते कोणत्या परिस्थितीत लागू असेल त्या गोष्ट स्पष्टपणे दर्शवाव्यात.

(जे) विनियम 7 मध्ये निर्दिष्ट केलेले कोणतेही उच्चलनयंत्र किंवा कोणतेही गियर यांच्या कोणत्याही भागावर चाचणीच्या प्रयोजनाखेरीज अन्यथा सुरक्षितपणे वाहून न्यावयाच्या वजनाच्या मर्यादेपेक्षा जास्त वजन ठेवू नये.

(के) उच्चलन उपयंत्राच्या मोटारी, गिअर,पारेषणे व विद्युत तारा यासारख्या घातक भागासंबंधी पुरेशा संरक्षक उपाययोजना करण्यात याव्यात.

(एल) वजनाचा काही भाग आकस्मिकपणे खाली पडण्याचा संभाव्य धोका कमी होईल अशा साधनांची तरतूद उच्चलन उपयंत्रामध्ये असावी.

अग्निप्रतिबंधक उपाययोजना

(एम) टांगलेल्या वजनाचा कोणताही भाग आकस्मिकपणे सरकण्याचा संभाव्य धोका कमी करण्यासाठी पुरेशी खबरदारी घ्यावी.

खंड 22 :-- कंत्राटदार कार्यकारी अभियंत्याच्या लेखी परवानगीशिवाय कोणतीही जंगम वस्तू झाडे, झुडपे किंवा गवत यास आग लावणार नाही.

बांधकामाच्या क्षेत्रात किंवा त्या बाहेर केलेल्या कोणत्याही हानीकरिता कंत्राटदाराची जबाबदारी राहील.

अशी परवानगी देण्यात येईल तेव्हा आणि तोडलेली किंवा खणून काढलेली झाडे,झुडपे,गवत, इत्यादी आग लावून नष्ट करावयाची असतील त्या सर्व बाबतीत अशी आग पसरू नये किंवा अन्यथा सभोवतालच्या मालमत्तेचे नुकसान होऊ नये अशा प्रकारे आवश्यक ती उपाययोजना कंत्राटदार करील. कंत्राटदार कामावर लावलेल्या कामगारासाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करील.

खंड 23 :-- खंड 22 मध्ये नमूद केलेल्या आगीमुळे झालेली कोणतीही हानी आणि जि.प. च्या मर्यादेतील किंवा मर्यादेबाहेरील मालमत्तेचे कंत्राटदारांच्या कामगारांनी सहेतुकपणे वा निर्हेतुकपणे केलेल्या सर्व हानी याबद्दल द्याव्या लागणाऱ्या नुकसान भरपाईचा अंदाज, अभियंता किंवा तो नेमील असा इतर अधिकारी काढील आणि अपील केल्यानंतर अधीक्षक अभियंत्यांच्या निर्णयाच्या अधीन असलेला अभियंत्याच्या हा अंदाज अंतिम असेल, व मागणी केल्यानंतर नुकसान भरपाईची निर्धारीत रक्कम देण्यास कंत्राटदार बांधील राहील. त्याने तसे करण्यात कसूर केल्यास खंड 1 मध्ये विहित केलेल्या पध्दतीनुसार कंत्राटदाराकडून ती हानी म्हणून वसूल करण्यात येईल किंवा अभियंता या कंत्राटानुसार किंवा अन्यथा कंत्राटदारास जि.प. कडून देय असलेल्या किंवा देय होणाऱ्या कोणत्याही रकमामधून ती (रक्कम) वजा करील.

स्त्री मजुरांना कामावर लावणे.

आग पसरू नये म्हणून घ्यावयाच्या सावधगिरीच्या उपायामध्ये कंत्राटदाराने हयगय केल्यामुळे इजा झालेल्या कोणत्याही व्यक्तीने केलेली कोणतीही कार्यवाही किंवा इतर न्यायालयीन कार्यवाही याविरूध्द कराव्या लागणाऱ्या बचावाचा खर्च कंत्राटदार सोशील व परिणामी, न्यायालयाने दिलेल्या निवाडयानुसार द्यावी लागणारी नुकसान भरपाई व खर्च देईल.

रविवारचे काम.

काम पोटभाड्याने देऊ नये.

खंड 24 :- बांधकामवरील स्त्री मजूरांना शक्यतो सैनिकांच्या बराकीच्या आसपास कामावर ठेवू नये.

खंड 25 :- कोणतेही काम अभियंत्यांच्या लेखी मंजूरीशिवाय रविवारी करता कामा नये.

खंड 26 :- कंत्राटदार अभियंत्याच्या लेखी मान्यतेशिवाय त्याची संविदा कोणीही व्यक्तीस अभिहस्तांकित करणार नाही किंवा पोटभाडयाने देणार नाही आणि कंत्राटदाराने त्यांची संविदा कोणाही व्यक्तीस अभिहस्तांकित केल्यास किंवा पोटभाडयाने दिल्यास किंवा तसे करण्याचा प्रयत्न केल्यास किंवा तो नादार झाल्यास किंवा आपण नादार आहोत असा अभिनिर्णय मिळविण्यासाठी त्याने कोणतीही कारवाई सुरू केल्यास किंवा त्यांच्या धनकोबरोबर कोणताही आपसमेळ केल्यास किंवा तशा प्रकारचा प्रयत्न केल्यास अथवा कोणत्याही शासकीय अधिकाऱ्यास किंवा शासनाच्या सेवेतील कोणत्याही व्यक्तीस तिच्या पदाशी किंवा सेवेशी कोणत्याही प्रकारे संबंधित असलेली लाच,उपदान,देणगी,कर्ज,परिलब्धि आर्थिक किंवा इतर प्रकारचे बक्षीस किंवा फायदा कंत्राटदाराने किंवा त्यांच्या कोणत्याही कर्मचाऱ्याने किंवा एजंटाने प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे दिल्यास वा देण्यासंबधीचे वचन दिल्यास किंवा देऊ केल्यास किंवा अशा कोणत्याही अधिकाऱ्याचे किंवा व्यक्तीचे संविदेमध्ये प्रत्यक्ष वा

(17)

अप्रत्यक्ष हितसंबंध गुंतलेले असल्यास अभियंता लागलीच लेखी नोटीस देऊन ती संविदा विखंडित करील व त्यानंतर कंत्राटदाराची प्रतिभूति ठेव जप्त झाली असे समजण्यात येईल व ती सर्वस्वी जि.प. च्या स्वाधीन असेल आणि त्याच्या खंड 3 अन्वये कंत्राट विखंडित, करण्यात आल्यास हेच परिणाम घडतील आणि याशिवाय, कंत्राटदारानुसार तत्पूर्वी प्रत्यक्षात पार पाडलेल्या कोणत्याही कामाबद्दल कोणतीही रक्कम वसूल करण्याचा किंवा घेण्याच्या कंत्राटदाराला हक्क असणार नाही.

कंत्राटदाराने मान्यतेशिवाय कंत्राट पोटभाड्याने दिल्यास किंवा शासकीय अधिका-यास लाच दिल्यास किंवा कंत्राटदार, नादार झाल्यास कंत्राट विखंडित करण्यात यावे व त्याची प्रतिभूति ठेव जप्त करण्यात यावी.

खंड 27 :- कंत्राटदाराने यापैकी कोणत्याही शर्तीनुसार भरपाई म्हणून द्यावयाची सर्व रकमा, प्रत्यक्ष सोसलेला तोटा किंवा हानी यांचा कोणताही निर्देश न करता कोणतीही हानी झाली असो अगर नसो जि.प. च्या वापरासाठी लागू करावयाची वाजवी भरपाई म्हणून समजण्यात याव्यात.

प्रत्यक्ष तोट्याचा निर्देश न करता भरपाई म्हणून द्यावयाची रक्कम ही वाजवी भरपाई समजली जावी.

खंड 28 :- भागीदारांनी केलेल्या निविदांच्या बाबतीत भागीदारी संस्थेच्या घटनेमध्ये करण्यात येणारा कोणताही बदल कंत्राटदार अभियंत्यांच्या माहितीसाठी ताबडतोब अधिसूचित करील.

भागदारी संस्थेच्या घटनेतील बदल अधिसुचित केले जावेत.

खंड 29 :- कंत्राटानुसार पार पाडावयाची सर्व बांधकामे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या निदेशानुसार पार पाडण्यात येतील सर्व बाबतीत जि.प.च्या त्यावेळी असलेल्या कार्य. अभियंत्यास ती कोणत्या ठिकाण व कोणत्या पध्दतीने सुरू करावयाची याबाबत निदेश देण्याचा हक्क असेल.

बांधकामे जि. प. मुख्य कार्यकारी अभियंत्याच्या निदेशानुसार करावीत.

खंड 30 :- संविदेमध्ये अन्यथा विनिर्दिष्ट केले असल्याखेरीज आणि त्यावेळी अंमलात असलेल्या संहिता नियमानुसार जि.प. च्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्रदान केलेल्या शक्तीस अधीन राहून यात यापूर्वी नमूद केलेले विनिर्देश, संकल्पचित्रे, आरेखने व अनुदेश यांच्या अर्थासंबंधाचे व कारागिरीचा किंवा कामासाठी वापरलेल्या सामग्रीचा दर्जा यासंबंधीचे सर्व प्रश्न किंवा संविदा, संकल्पचित्रे, आरेखने,विनिर्देश,अंदाज,अनुदेश,आदेश किंवा या शर्ती यामधून कोणत्याही प्रकारे उद्‌भवणरी किंवा अन्यथा बांधकाम चालू असताना किंवा पूर्ण झाल्यानंतर किंवा बांधकाम सोडून दिल्यानंतर उद्‌भवणाऱ्या बांधकामासंबंधीचा किंवा ते पार पाडणे किंवा ते पार पाडण्यात केलेल्या कसुरीसंबंधीचा कोणताही दावा, हक्क प्रकरण किंवा गोष्ट याबाबत इतर कोणताही प्रश्न यांच्या बाबतीत मंडळाच्या त्यावेळी असलेल्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा निर्णय सर्व पक्षकारांना अंतिम निर्णायक व बंधनकारक असेल.

मुख्य कार्य, अधिका-याचा निर्णय अंतिम राहील.

खंड 31 :- ज्यासंबंधी निविदा करण्यात आली आहे अशा अंदाजित बांधकामाच्या भागाच्या बाबतीत ठोक रकमा अंतर्भूत असतील तर अशा बाबतीत अंतर्भूत असलेल्या कामाच्या बाबीच्या संबंधात किंवा प्रस्तुत बांधकामाच्या भागाच्या संबंधात प्रत्येक बाजूकरिता या संविदेमध्ये जे दर देय असतील त्याच दरांनी रक्कम घेण्याचा कंत्राटदारास हक्क असेल किंवा प्रभारी अभियंत्याच्या मते प्रस्तुत बांधकामाच्या भागाचे मोजमाप करणे शक्य नसल्यास अभियंत्याने स्वेच्छा निर्णयाने अंदाजित नोंदवलेली ठोक रक्कम द्यावी आणि या खंडाच्या उपबंधानुसार कंत्राटदाराला देय असलेली कोणतीही रक्कम किंवा असलेल्या कोणत्याही रकमा यांच्या संबंधात अभियंत्यांचे लेखी प्रमाणपत्र कंत्राटदाराविरुध्द अंतिम व निर्णायक राहील.

अंदाजित ठोक रकमा

खंड 32 :- ज्याकरिता नियम 1 मध्ये नमूद केल्याप्रमाणे विनिर्देश नाहीत असे कोणत्याही प्रकारचे बांधकाम हे विभागीय विनिर्देशानुसार पार पाडावे आणि असा कोणताही विभागीय विनिर्देश नसल्यास अशा बाबतीत बांधकाम सर्वस्वी अभियंत्याच्या सूचनेनुसार व आवश्यकतेनुसार पार पाडावे.

विनिर्देश नसतील तेथील कारवाई

खंड 33 :- अशा बांधकामास या विषयात किंवा या संदर्भात काही प्रतिकूल असल्याखेरीज अन्यथा त्या अटीमध्ये वापरलेल्या 'बांधकाम' किंवा 'बांधकामे' या शब्दप्रयोगाचा अर्थ, कंत्राटानुसार किंवा कंत्राटामुळे पार पाडावयाचा करार केलेली स्थायी किंवा अस्थायी आणि मूळ,फेरफार,केलेली पर्यायी किंवा अतिरिक्त बांधकाम असा होतो.

बांधकामाची व्याख्या

खंड 34 :- दिलेल्या कोणत्याही मालाची किंमत वजा करण्यापूर्वी निविदेमध्ये निर्दिष्ट केलेली टक्केवारी बिलाच्या स्थूल रकमेतून वजा करण्यात येईल. स्थूल रक्कमेत मिळविण्यात येईल.

बिलाच्या स्थूल किंवा निव्वळ रकमाना लागू असलेली कंत्राटदाराची टक्केवारी.

खंड 35 :- दगडखाण फी, स्वामित्वधन, जकातीच्या देय रकमा, माल साठविण्यासाठी कोणतेही जमीनभाडे द्यावयाचे असल्यास ह्या सर्व रकमा कंत्राटदार देईल. तथापि हा माल शासकीय कामासाठी आवश्यक होता असे प्रमाणपत्र अभियंत्याकडून मिळाल्यानंतर नियमानुसार अनुज्ञेय असल्याप्रमाणे अशा या खर्चाचा परतावा मिळण्याचा कंत्राटदारास हक्क असेल.

दगडखाण फी व स्वाभित्वधन याचा परतावा.

(18) श्रमिक भरपाई अधिनियमान्वये भरपाई.

खंड 36 :- कामगारांना झालेल्या दुखापतीकरिता कंत्राटदार जबाबदार असून श्रमिक भरपाई अधिनियम, 1923(1923 चा आठ) (यापुढे उक्त अधिनियम म्हणून संबोधण्यात येणारा) या अन्वये त्यांना आपल्या कामगारांना देय असलेली कोणतीही भरपाई दिली पाहिजे. अशा प्रकारची भरपाई मुद्दल म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम 12 च्या पोट-कलम (1) अन्वये कंत्राटदाराच्या वतीने देय असेल तर ती पोट-कलम (2) अन्वये जि.प. कंत्राटदाराकडून वसूल करता येईल. अशा प्रकारची भरपाई वरील खंड 1 मध्ये दिलेल्या पध्दतीनुसार वसूल करण्यात येईल.

खंड 36 अ :- अपघातामुळे शारीरीक इजा झालेल्या एखाद्या कामगाराला वैद्यकीय सहाय्य पुरविण्याच्या खर्चासाठी कंत्राटदार जबाबदार असेल व तो खर्च देईल अशा प्रकारचा खर्च जि.प. ने केला असेल तर तो जि.प. ला कंत्राटदाराकडून ताबडतोब वसूल करता येईल व जि.प.च्या इतर कोणत्याही उपाययोजनेला हानी न पोचवता कंत्राटदाराला देय असलेल्या व देय होणाऱ्या कोणत्याही रकमेमधून वजा करता येईल.

खंड 36 ब :- बांधकामाच्या जागेवर काम करणाऱ्या कामगारांच्या वापराकरिता आवश्यक ती वैद्यकीय सुरक्षा,साधनसामग्री व प्रथमोपचार उपकरणसंच कंत्राटदार पुरवील व कोणत्याही वेळी तातडीच्या वापरासाठी ते सुस्थितीत ठेवील आणि त्यासंबंधी पुढील नियमांचे अनुपालन करीलः-

(अ) कंत्राटदाराने पुरविलेली साधनसामुग्री कामगारांनी उपयोगात आणली पाहिजे व त्या सामग्रीचा वापर संबंधिताकडून योग्य रीतीने होत आहे याची खात्री करून घेण्यासाठी कंत्राटदार पुरेशी उपाययोजना करील.

(ब) जेथे बुडण्याचा धोका आहे अशा जागेजवळ बांधकाम चाललेले असेल तर आवश्यक ती साधनसामग्री पुरवण्यात येईल व वापरासाठी तसार ठेवण्यात येईल व संकटात सापडलेल्या व्यक्तीस वाचविण्यासाठी आवश्यक ते तातडीचे उपाय योजण्यात येतील.

(क) काम करीत असताना होणाऱ्या संभाव्य दुखापतीच्या उपचारासाठी तातडीच्या प्रथमोपचाराची पुरेशी तरतुद करण्यात येईल.

निविदा किंवा अंदाज यात नोंदलेल्या परिमाणाकरिता दावा.

खंड 37 :- निविदेत दर्शविलेली कामाची परिमाणे ही अदमासे असून निविदेत व अंदाजात नोंद केलेल्या कामाच्या परिमाणापेक्षा काम जास्त किंवा कमी होत असल्यास कोणताही दावा विचारार्थ स्वीकारला जाणार नाही.

दुष्काळी इ. मजूर कामावर लावणे.

खंड 38 :- अभियंत्याने तसे लेखी आदेश दिल्यास, कंत्राटदार दुष्काळी सिध्दापराधी किंवा कोणत्याही विशेष प्रकारचे किंवा विशेष प्रकारचे वर्गाचे कामगार कामावर लावील.

बांधकाम सुरु करण्यात लागणा-या विलंबाच्या भरपाईसाठी दावा.

खंड 39 :- भूमि संपादनामुळे बांधकाम सुरु करण्यास लागणाऱ्या कोणत्याही विलंबामुळे किंवा अंदाजास मंजूरी मिळवण्यास लागणाऱ्या कोणत्याही विलंबामुळे बांधकामाच्या जागेची साफसफाई करण्याच्या बाबतीत उद्भवणाऱ्या कोणत्याही विलंबाबाबत कोणतीही भरपाई दिली जाणार नाही.

बांधकामाच्या अंमल-बजावणीसाठी होणा-या विलंबाकरीता असलेल्या भरपाईसाठी दावा.

खंड 40 :- जवळपासच्या खळग्यामध्ये किंवा भूखंडामध्ये साचलेल्या पाण्यामुळे बांधकाम पार पाडण्यास लागणाऱ्या विलंबाकरीता भरपाई दिली जाणार नाही. या दरामध्ये कठीण किंवा भेगा पडलेली जमिन, चिखलातील उत्खनन,जमिनीखालील पाणी किंवा जवळपासच्या खळग्यामधील पाण्याची उपसणी याचा अंतर्भाव असून त्यांच्या करीता स्पष्टपणे विनिर्दिष्ट केलेले असल्याखेरीज कोणत्याही जादा दराची मागणी विचारात घेतली जाणार नाही.

बांधकामाचा कोणताही भाग सुरू करणे.

खंड 41 :- बांधकामाचा अभियंता किंवा त्याचा दुय्यम अधिकारी यांच्या लेखी प्राधिकार पत्राखेरीज किंवा अनुदेशाखेरीज कंत्राटदार बांधकामाचा कोणताही भाग सुरू करणार नाही. असा प्राधिकार पत्राशिवाय बांधकामाच्या मोजणीसंबंधी किंवा त्यांच्या प्रदानासंबंधी कंत्राटदार मागणी करू शकणार नाही.

कामावर लावलेल्या व्यक्तीचे किमान वय, गाढवे आणि किंवा इतर जनावरे कामावर लावणे व वाजवी मजूरीचे प्रदान

खंड 42 :- (1) कोणताही कंत्राटदार 12 वर्षे वयाखालील कोणत्याही व्यक्तीस कामावर लावणार नाही.

(2) बारीक दोऱ्यांनी कसलेली गाढवे कोणताही कंत्राटदार कामावर लावणार नाही. कसावयाच्या दोरीची रुंदी कमीत कमी तीन इंच असावी आणि ती नवारीची असावी.

(3) कोणतेही दुखापती झालेले, लंगडे,कृश किंवा अल्पवयीन जनावरे कामावर जुंपले जाऊ नये.

(4) काम करणारी कोणतीही व्यक्ती किंवा जनावर या अटी पूर्ण न करता काम करीत असल्याचे आढळून आल्यास तिला किंवा त्याला कामावरून काढून टाकण्याचे प्राधिकार आभियंता किंवा त्याचा अभिकर्ता याला आहेत आणि त्यांना काढून टाकण्यामुळे काम पूर्ण करण्यास लागणाऱ्या विलंबाची कोणतीही जबाबदारी जि.प. कडून स्वीकारली जाणार नाही.

(5) संविदेनुसार हाती घेतलेल्या कामावर लावलेल्या कामगारांना कंत्राटदार वाजवी मजूरी देईल. कामगारांना देण्यात येणारी मजूरी वाजवी नाही या मुद्यावरून कामगार व कंत्राटदार यांच्यात कोणताही वाद निर्माण झाल्यास तो ताबडतोब कार्यकारी अभियंत्याकडे निर्दिष्ट करण्यात येईल व कार्यकारी अभियंता त्याबाबत निर्णय देईल. कार्यकारी अभियंत्याचा निर्णय निर्णायक व कंत्राटदारावर बंधनकारक राहील. परंतु निर्णयाचा, मंजूर निविदादराने जि.प. कडून करावयाच्या प्रदानविषयीच्या संविदेतील कोणत्याही अटीवर कोणत्याही प्रकारचा परिणाम होणार नाही.

(6) कामगारांसाठी पिण्याच्या पाण्याची सोय कंत्राटदार करील. नागरी भागातील मोठया कामावर काम करणाऱ्या कामगारांसाठी अशाच प्रकारच्या सोईची व्यवस्था करण्यात येईल.

प्रदानाची पध्दती

खंड 43 :- कंत्राटदारांना, विभागातील त्यांना सोईस्कर असलेल्या कोणत्याही कोषागारावर धनादेश काढून प्रदान करण्यात येईल. मात्र ही रक्कम 10 रूपयाहून अधिक असावी. 10 रूपयापेक्षा अधिक नसणारी रक्कम रोख दिली जाईल.

बांधकामासाठी निविदा देण्यापुर्वी शर्ती मान्य करणे सक्तीचे असणे.

खंड 44 :- ह्या शर्ती मान्य न करणाऱ्या कोणत्याही कंत्राटदाराला बांधकामाची निविदा देण्याची परवानगी देण्यात येणार नाही.

टंचाई कामगार कामावर लावणे.

खंड 45 :- बांधकामापासून 10 मैलाच्या टापूत असलेल्या कोणत्याही खेडयात टंचाईची अथवा दुष्काळी परिस्थिती आहे असे शासनाने घोषित केले असल्यास कंत्राटदार अशा बांधकामाच्या अकुशल कामगारांनी करण्यायोग्य असलेल्या भागावर कार्यकारी अभियंत्याकडून प्रमाणित करण्यात आलेल्या किंवा कार्यकारी अभियंत्याने, सहाय्याची गरज असल्याचे लेखी कळवून पाठविलेल्या कोणत्याही व्यक्तीला कामावर ठेवील आणि जि.प. यासाठी निश्चित केलेल्या किमान मजुरीपेक्षा कमी नसेल इतकी मजूरी देण्यास तो बांधील असेल. या खंडाच्या अंमलबजावणीच्या संबंधात निर्माण होणाऱ्या कोणत्याही वादाचा निर्णय कार्यकारी अभियंत्याने द्यावा व त्याचा निर्णय अंतिम व कंत्राटदारावर बंधनकारक राहील.

